
रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक १००
www.ramprahar.com
शुक्रवार, २७ ऑक्टोबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

पनवेलमध्ये साथीच्या आजारांवर उपाययोजना/३
रायगड जिल्ह्यातील ६१ शिक्षकांचे समायोजन/५
वर्ल्डकपमध्ये श्रीलंकेचा इंग्लंडवर दणदणीत विजय/८

## शासकीय टंकलेखन परीक्षेचा निकाल जाहीर



**पुणे :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने यंदा जुलैमध्ये झालेल्या शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र (टंकलेखन) परीक्षेचा निकाल ऑनलाइन पद्धतीने जाहीर झाला आहे. परीक्षार्थींनी निकालापासून १० दिवसांत गुण पडताळणी आणि उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रती तसेच पुनर्मुल्यांकनासाठी अर्ज करावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे सहायक आयुक्त संगीता घोडेकर यांनी केले आहे. परीक्षेचा निकाल www.mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना गुणपत्रकांची ऑनलाइन प्रिंट घेता येणार आहे. विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे, गुणपत्रके डिजिटल स्वाक्षरीने ऑनलाइन स्वरूपात संबंधित संस्थांच्या लॉगीनला उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

# गरीब कल्याणासाठी सरकार कार्यरत

## महाराष्ट्र दौऱ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदींचे प्रतिपादन



**अहमदनगर : प्रतिनिधी**

देशाला गरीबीपासून मुक्ती मिळाली पाहिजे. गरीबांना पुढे जाण्याची संधी मिळाली पाहिजे हाच सच्चा न्याय आहे. आपले सरकार सबका साथ सबका विकास हा मंत्र घेऊन पुढे चालले आहे. आमची प्राथमिकता गरीबांचे कल्याण आहे. आज देशाची अर्थव्यवस्था वाढतेय. त्यात गरीब कल्याणासाठी सरकारचे बजेटही वाढत आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी (दि. २६) केले.

महाराष्ट्र दौऱ्यावर आलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वप्रथम शिर्डी येथे साईबाबांचे दर्शन घेतले. तेथे त्यांच्या हस्ते महाराष्ट्रातील १४ हजार कोटी रुपयांहून अधिक विकास प्रकल्पांचे लोकार्पण, उद्घाटन आणि भूमिपूजन करण्यात आले. निळवंडे धरणाच्या डाव्या कालव्याचे लोकार्पण व जलपूजनही करण्यात आले. यानिमित्ताने त्यांनी मार्गदर्शन केले.

या विविध कार्यक्रमांना केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील, वित्त राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, गिरीश महाजन, सुरेश खाडे, धनंजय मुंडे, अतुल सावे, भाजप प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते.



**शिर्डी : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी साईबाबा समाधी मंदिरात दर्शन घेतले.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढे म्हणाले की, महाराष्ट्रात एक कोटी १० लाख आयुष्मान कार्ड दिले. या सर्व कार्डधारकांना पाच लाख रुपयांच्या मोफत उपचाराची हमी आहे. गरिबांना मोफत रेशनसाठी चार लाख कोटींहून अधिक खर्च केले. गरीबांच्या घरांसाठी चार लाख कोटी रुपये खर्च केले. २०१४च्या आधीच्या दहा वर्षांच्या तुलनेत हे सगळे खर्च सहापट जास्त आहेत. नळ ते जल योजनेत आतापर्यंत दोन लाख कोटी खर्च झाले. पीएम विश्वकर्मा योजनेचा लाभ कुटुंबांना मिळत आहे. मी इतके आकडे सांगतोय, २०१४च्या आधीही तुम्ही आकडे ऐकत होता, पण किती लाख कोटींचा भ्रष्टाचार, घोटाळा हे होते. आता इतके लाख कोटींची विकासकामे, योजना आहे, असे म्हणत पंतप्रधान मोदींनी काँग्रेसवर टीका केली.

शेतकऱ्यांच्या सशक्तीकरणासाठी आम्ही प्रयत्न करतोय, मात्र काही लोकांनी शेतकऱ्यांच्या नावावर कायम राजकारण केले आहे. राज्यातील एक वरिष्ठ नेते केंद्रात कित्येक वर्षे कृषी मंत्री होते. व्यक्तिगत मी त्यांचा सन्मान करतो, पण त्यांनी शेतकऱ्यांसाठी काय केले, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी नाव न घेता खासदार शरद पवारांवर हल्लाबोल केला.

महाराष्ट्रात अपार सामर्थ्य आहे. जितका जलद महाराष्ट्राचा विकास होईल तितकाच भारताचा विकास होईल. २०४७ साली स्वातंत्र्याला १०० वर्ष होतील तेव्हा जगात भारताचे नाव विकसित देशांमध्ये होईल हा संकल्प करूया, असे ते म्हणाले.

### नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचाही शुभारंभ

केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या धर्तीवर महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांसाठी सुरू केलेल्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेंतर्गत शेतकऱ्यांना केंद्राच्या योजनेव्यतिरिक्त सहा हजार रुपये दरवर्षी देण्यात येणार आहेत. या योजनेमुळे केंद्र आणि राज्याचे मिळून १२ हजार रुपये शेतकऱ्यांना मिळणार आहेत. या योजनेसाठी या वर्षी सहा हजार ९०० कोटी रुपयांची तरतूद केली असून आज सुमारे ८६ लाख शेतकऱ्यांच्या खात्यावर १७१२ कोटी रुपयांच्या पहिल्या हप्त्याचे वितरण पंतप्रधान मोदींच्या हस्ते करण्यात आले.



# धरणा कॅम्प येथील अदानी ॲग्रोला १० दिवसांचा अल्टीमेटम

## भूमिपुत्रांच्या मागण्या मान्य न केल्यास तीव्र आंदोलन -आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्थानिक भूमिपुत्रांच्या मागण्या मान्य न केल्यास धरणा कॅम्प येथील अदानी ॲग्रो लॉजिस्टिकच्या विरोधात तीव्र आंदोलन करणार असल्याची घोषणा आमदार प्रशांत ठाकूर यांनी गुरुवारी (दि. २६) धरणा कॅम्प येथे करून अदानी ॲग्रो कंपनीला दहा दिवसांचा अल्टीमेटम दिला आहे.

> **आमच्या परिसरातील शेतकऱ्यांच्या जागा घेऊन या ठिकाणी प्रकल्प उभारला गेला. भूमिपुत्र स्थानिकांच्या मागणीसंदर्भात अनेकदा मागणी केली, मात्र व्यवस्थापन चालढकलपणा करीत राहिले. अखेरीस आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निदर्शनास ही बाब आणून दिली. त्यांनी लागलीच भूमिपुत्रांच्या हक्कासाठी आपण रस्त्यावर उतरणार असल्याचे सांगत आज हे आंदोलन करून स्थानिकांचा आवाज बुलंद केला. त्यामुळे मी त्यांचे आभार मानतो. -नंदकुमार म्हात्रे, भाजप युवा नेते**

धानसर, धरणा, धरणा कॅम्प, खुटारी, पिसार्वे येथील स्थानिक भूमिपुत्रांची जमीन अदानी ॲग्रो कंपनीने संपादित केली असून त्या जमिनीवर अदानी लॉजिस्टिक कंपनीची उभारणी झाली आहे. जमीन विकत घेत असताना स्थानिक भूमिपुत्रांना कामे, नोकरीत समावेश तसेच गावाला प्राथमिक सुविधा, रस्ता देण्यात आलेल्या आश्वासनासंदर्भात अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नाही. त्यामुळे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली धरणा कॅम्प येथे कंपनीच्या प्रवेशद्वारावर काम बंद आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा उपाध्यक्ष सुभाष कदम, प्रल्हाद केणी, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक हरेश केणी, गुरूनाथ गायकर, रवी म्हात्रे, युवा नेते नंदकुमार म्हात्रे, प्रशांत कदम, समीर कदम, तालुका उपाध्यक्ष सचिन पाटील, चाहुशेठ पाटील, बजरंग दल अध्यक्ष मोतीराम गोंधळी, ओवे विभागीय अध्यक्ष प्रभाकर जोशी, माजी सरपंच राम पाटील, कृष्णा पाटील, तन्वी घरत, संतोष पाटील, विनोद घरत, भास्कर तरे, राजेश महादे, वैजनाथ पाटील, (पान २ वर..)

## निवडक

### आठ भारतीय माजी नौसैनिकांना कतारमध्ये मृत्यूदंडाची शिक्षा

**दोहा :** इस्रायलसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपावरून भारतीय नौदलाच्या आठ माजी कर्मचाऱ्यांना कतारमध्ये मृत्यूदंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. तेथील न्यायालयाने हा निर्णय दिला. दरम्यान, भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने, आम्ही या माजी अधिकाऱ्यांच्या कुटुंबातील सदस्य आणि कायदेशीर टीमच्या संपर्कात आहोत. कतारच्या अधिकाऱ्यांसमोर आम्ही बाजू मांडणार आहोत, असे म्हटले आहे.

### उद्धव ठाकरे, संजय राऊत यांचा दोषमुक्ती अर्ज फेटाळला

**मुंबई :** खासदार राहुल शेवाळे मानहानीप्रकरणी माजी मुख्यमंत्री व दै. सामनाचे संपादक उद्धव ठाकरे आणि खासदार व 'सामना'चे कार्यकारी संपादक संजय राऊत यांना न्यायालयाने दिलासा देण्यास नकार दिला आहे. दोषमुक्तीसाठी त्यांनी केलेला अर्ज माझगाव महानगर दंडाधिकारी कोर्टाने फेटाळला.

# वारकरी सांप्रदायाचा प्रसारक हरपला!

## ज्येष्ठ कीर्तनकार बाबा महाराज सातारकर यांचे निधन



**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. बाबा महाराज सातारकर यांचे गुरुवारी (दि. २६) पहाटे निधन झाले. ते ८८ वर्षांचे होते. नवी मुंबईतील नेरूळ येथे त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनामुळे अवघ्या महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय परंपरेतील समुदायावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

सातारच्या नामवंत गोरे सातारकर घराण्यात ५ फेब्रुवारी १९३६ रोजी बाबा महाराज सातारकर यांचा जन्म झाला होता. निळकंठ ज्ञानेश्वर गोरे हे त्यांचे मूळ नाव होते, पण पुढे त्यांच्या कीर्तनाला मिळालेल्या व्यापक स्वीकृतीतून त्यांना 'बाबा महाराज सातारकर' हे नाव मिळाले, जे आयुष्यभर त्यांच्यासोबत राहिले. त्यांनी आपले आयुष्य अध्यात्माच्या प्रचार प्रसारासाठी अर्पण केले. कीर्तनाच्या माध्यमातून त्यांनी जनसामान्यांचे साध्या, सोप्या भाषेत प्रबोधन केले.

बाबा महाराज सातारकर नेरूळच्या आगरी कोळी भवनासमोरच्या एका वसाहतीत वास्तव्यास होते. त्यांच्या पश्चात त्यांच्या दोन मुली ह.भ.प. भगवती महाराज, रासेश्वरी सोनकर आणि नातवंडे असा परिवार आहे. बाबा महाराज सातारकर यांच्या पार्थिवावर शुक्रवारी (दि. २७) सायंकाळी ५ वाजता नेरूळ येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त होत आहे.

# यू ट्यूबला लाइक करण्यासाठी आमिष दाखवून ५० लाखांना गंडा


**पुणे : प्रतिनिधी**

यू ट्यूबला सबस्क्राइब आणि लाइक करण्यासाठी चांगले कमिशन देण्याचे आमिष दाखवून सायबर चोरट्यांनी एका तरुणाला ५० लाख रुपयांना गंडा घातल्याचा प्रकार समोर आला आहे. याबाबत शुलभ नांगर (वय ३४, रा. धानोरी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सायबर चोरट्यांनी फिर्यादी नांगर यांना मोबाईलवर संपर्क साधला. त्यांनी यू ट्यूबला सबस्क्राइब आणि लाइक करण्यासाठी आकर्षक कमिशन मिळेल असे सांगितले. त्यानुसार आरोपींनी नांगर यांना सुरुवातीला एक हजार ३५० रुपये कमिशनही दिले. त्यानंतर टेलिग्राम ॲपवर लिंक पाठवून कमिशनचे आमिष दाखवून व्यवसायात गुंतवणूक करण्याच्या बहाण्याने वेळोवेळी ४९ लाख ६८ हजार रुपये घेतले, मात्र त्यापोटी काही मोबदला दिला नाही. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर नांगर यांनी सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. सायबर पोलिसांनी संबंधित टेलिग्राम ॲपधारकांविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# रायगड जिल्ह्यात सरपंचपदासाठी ४८५, तर सदस्यपदासाठी ३३९५ उमेदवार रिंगणात

**अलिबाग : प्रतिनिधी**



रायगड जिल्ह्यातील २१० ग्रामपंचायतींच्या सरपंचपदासाठी ४८५, तर सदस्यपदासाठी ३३९५ उमेदवार रिंगणात उरले आहेत. निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाल्याने प्रचाराला वेग आला आहे.

जिल्ह्यात थेट सरपंचपदासाठी ८२५ उमेदवारी अर्ज आले होते. त्यापैकी ११ अर्ज छाननीत अवैध ठरले. २६ ऑक्टोबर हा अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस होता. ३२९ जणांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले. त्यामुळे ४८५ उमेदवार आता रिंगणात उरले आहेत.

अलिबाग तालुक्यात ५२, मुरूड १७, पेण १९, पनवेल ३६, उरण ५, कर्जत १६, खालापूर ३३, रोहा ३१, सुधागड १५, माणगाव ३६, तळा १३, महाड २२, पोलादपूर २२, श्रीवर्धन ४, म्हसळा ७ अशा एकूण ३२९ जणांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले. आता सरपंचपदाच्या निवडणूक रिंगणात अलिबाग तालुक्यात ४३, मुरूड ३८, पेण २५, पनवेल ४७, उरण ९, कर्जत २१, खालापूर ६१, रोहा ३५, सुधागड २९, माणगाव ५८, तळा १५, महाड ३६, पोलादपूर ३९, श्रीवर्धन १३, म्हसळा १६ असे एकूण ४८५ उमेदवार उरले आहेत.

१८५४ सदस्यांसाठी ४७१६ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. त्यापैकी ४८ अर्ज छाननीत अवैध ठरले, तर १२७३ जणांनी अर्ज मागे घेतले. त्यामुळे सदस्यपदासाठी आता ३३९५ उमेदवार रिंगणात आहेत.

# रायगडातील अमृत कलश दिल्लीकडे रवाना

**अलिबाग : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त केंद्र सरकारतर्फे संपूर्ण देशात माझी माती, माझा देश अभियान राबविण्यात येत आहे. रायगड जिल्ह्यात या अभियानांतर्गत गावागावातील माती कलशामध्ये संकलित करण्यात आली. तालुकास्तरावर गावांमधून आलेल्या कलशांतील माती एकत्र करण्यात येऊन प्रत्येक तालुक्याचा एक प्रातिनिधिक कलश तयार करून ते गुरुवारी (दि. २६) मुंबईमार्गे दिल्लीला रवाना करण्यात आले. अमृत कलश घेऊन जाण्यासाठी नेहरू युवा केंद्राचे स्वयंसेवक मार्गस्थ झाले आहेत.

१ ते ३० सप्टेंबरदरम्यान रायगड जिल्ह्यात माझी माती, माझा देश अभियानांतर्गत ८०९ ग्रामपंचायतींमध्ये पारंपरिक वेशभूषेत, वाजत गाजत अमृत कलशामध्ये माती व तांदूळ जमा करण्यात आले. यानंतर हे अमृत कलश तालुकास्तरावर पाठविण्यात आले. तालुकास्तरावर गावांमधून आलेल्या कलशातील माती एकत्र येऊन तालुक्याचा एक प्रातिनिधिक कलश तयार करण्यात आला आहे तसेच उर्वरित माती अमृत वाटिका तयार करण्यासाठी वापरण्यात येणार आहे.

तालुकास्तरावर तयार करण्यात आलेले १५ तसेच पनवेल महानगरपालिकेचा एक असे १६ अमृत कलश गुरुवारी दिल्लीकडे रवाना झाले. राजधानी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम होणार असून तेथे अमृतवाटिका आणि अमृत स्मृती उद्यानाची निर्मिती करण्यात येणार आहे.

दिल्ली येथे अमृत कलश घेऊन जाणाऱ्या स्वयंसेवकांना जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, उपजिल्हाधिकारी विठ्ठल इनामदार, जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव, नगरपालिका प्रशासन अधिकारी श्याम पोशेट्टी यांनी शुभेच्छा दिल्या.



# पीएमईजीपी अंतर्गत कार्यवाही न केल्याने बँकेवर गुन्हा दाखल

**अलिबाग : प्रतिनिधी**

केंद्र व राज्य सरकारमार्फत रोजगार निर्मितीच्या विविध योजना राबविण्यात येत आहेत. जिल्हा उद्योग केंद्रामार्फत पात्र ठरणाऱ्या कर्ज प्रकरणात बँकामार्फत विहित कालावधीत निर्णय घेणे अपेक्षित आहे, मात्र प्रकरणे प्रलंबित ठेवून नंतर नाकारण्यात येत असल्यामुळे जिल्ह्यातील उद्दिष्ट साध्य होत नव्हते. नियमानुसार कालावधीत प्रकरणे निकाली न काढणाऱ्या बँकावर कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल, असा इशारा जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी बँकर्सना दिला होता. त्यानंतरही कार्यवाहीमध्ये सुधारणा न झाल्याने बँक ऑफ महाराष्ट्रच्या महाड तालुक्यातील बिरवाडी येथील शाखेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सातत्याने कर्ज प्रकरण करण्यात दिरंगाई आणि टाळाटाळ करणाऱ्या बँका आणि बँकर्स यांना कामगिरी सुधारण्याबाबत जिल्हास्तरीय बँकर्स समितीच्या बैठकीमध्ये जिल्हाधिकारी डॉ. म्हसे यांनी वेळोवेळी निर्देश दिले होते तसेच अपेक्षित कार्यवाही पूर्ण न करणाऱ्या बँकावर गुन्हे दाखल करण्यात येतील, असेही स्पष्ट केले होते.

प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (पीएमईजीपी) अंतर्गत जिल्ह्यातील प्रकरणांच्या कार्यवाहीबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी आढावा घेतला असता जिल्हा उद्योग केंद्रामार्फत जिल्ह्यातील विविध बँकांना पाठविण्यात आलेल्या प्रकरणांच्या मंजुरीबाबत काही बँकांकडून दिरंगाई व टाळाटाळ केल्याची बाब आढळून आली.

या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील विविध बँकांच्या कामगिरीचा तालुकानिहाय आढावा घेण्यात आला. यामध्ये बँक ऑफ महाराष्ट्रच्या बिरवाडी येथील शाखेमार्फत पीएमईजीपी उपक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये हलगर्जीपणा झाल्याचे आढळून आल्याने या बँकेवर जिल्हा उद्योग केंद्रामार्फत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया करण्यात आली आहे.

# महाराष्ट्रात थंडीची चाहूल

**पुणे : प्रतिनिधी**

राज्यात थंडीची चाहूल लागली आहे. हळूहळू ऑक्टोबर हीट मावळतीकडे, तर पहाटेचा गारवा उगवतीकडे जात असल्याचे जाणवत आहे.

राज्यातील वातावरणात बदल होताना दिसत आहे. कुठे उन्हाचा चटका लागत आहे, तर कुठे थंडीची चाहूल लागली आहे. सध्या पहाटेच्या गारव्यात कमालीची वाढ झाल्याची माहिती ज्येष्ठ हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली.

संपूर्ण महाराष्ट्रात पहाटेचे किमान तापमान भागपरत्वे सरासरीपेक्षा कमी जाणवत आहे. मध्य महाराष्ट्रातील खान्देश, नाशिकपासून सोलापूरपर्यंतच्या १० जिल्ह्यांत तापमान २ ते ५ डिग्रीने कमी गेले आहे.

# नऊ वर्षांत सिंचनासाठी ३० हजार कोटी दिले -उपमुख्यमंत्री फडणवीस

**शिर्डी : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या नऊ वर्षांच्या काळात महाराष्ट्रात सिंचनासाठी ३० हजार कोटी रुपये दिले आहे. त्यामुळे महाराष्ट्रात आम्ही सिंचनाची कामे पूर्ण करु शकलो, असे मत राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. निळवंडेसारखा प्रकल्प सुरू होत आहे. माझ्या जन्माच्या पूर्वी हा प्रकल्प सुरू करण्यात आला होता. आज त्याचे उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते होत आहे याचा आनंद असल्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.



साई भूमितील विकासकामांचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होत आहे याचा आनंद आहे. जगभरातून साईभक्त सातत्याने या ठिकाणी येतात. याठिकाणी विविध उपक्रम येत आहेत. महाराष्ट्रातील ५० टक्के भाग हा दुष्काळग्रस्त आहे. या भागात जास्त प्रमाणात पाऊस पडत नाही. त्यामुळे त्या ठिकाणी पाण्याची समस्या निर्माण होते. या भागाला पाणी मिळाले पाहिजे. जोपर्यंत या ठिकाणी पाणी मिळत नाही तोपर्यंत महाराष्ट्राला मागच्या ५० वर्षांत लागलेला आत्महत्येचा कलंक समाप्त करू शकणार नसल्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. हे काम पंतप्रदान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वातच पूर्ण होऊ शकते असेही त्यांनी नमूद केले. पश्चिमी वाहिनी असणाऱ्या नद्यांचे जे पाणी समुद्रात जात आहे, ते पाणी गोदावरी नदीत घेऊन अहमदनगर, नाशिकसह संपूर्ण मराठवाड्याला सुजलाम सुफलाम करु शकतो असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.


याचे पूर्ण स्ट्रक्चर आम्ही तयार केल्याचे फडणवीस म्हणाले. विदर्भात असणाऱ्या वैनगंगा नदीचे वाया जाणारे पाणी देखील विदर्भातील दुष्काळी भागात नेण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे फडणवीस म्हणाले.

### महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्याचा प्रयत्न

**विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्र हे तिन्ही भाग कायम दुष्काळमुक्त करण्याचा आमचा प्रयत्न आहे. यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आशिर्वादाची गरज असल्याचे फडणवीस म्हणाले. यापूर्वी तुम्ही आम्हाला कायम मदत केली आहे. पुढच्या काळातही केंद्र सरकार मदत करेल. दरम्यान, येणाऱ्या काळात मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील पुढच्या पिढीला दुष्काळ पाहावा लागणार नसल्याचा विश्वास उपमुख्यमंत्री फडणवीसांनी व्यक्त केला.**

# रुग्णाला घेऊ जाणाऱ्या रुग्णवाहिकेचा अपघात

## बीडमध्ये चौघांचा जणांचा मृत्यू; एकजण जखमी



**बीड : प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील धामणगाव येथून अहमदनगरकडे रुग्णाला घेऊन जात असताना दौलावडगावच्या दत्तमंदिराजवळ रुग्णवाहिका आणि ट्रकचा अपघात झाला आहे. रात्री १२ वाजण्याच्या दरम्यान हा अपघात झाला.

यामध्ये सांगवीपाटण येथील डॉ. राजेश झिंजुर्के आणि रुग्णवाहिकेचा ड्रायव्हर भरत लोखंडेसह अन्य दोन जण असे चौघांचा मृत्यू झाला तर एका जखमीवर उपचार सुरू आहेत. या रुग्णवाहिकेमध्ये एकूण पाच जण होते.

अधिक माहितीनुसार, आष्टी तालुक्यातील दौलावडगाव शिवारात दत्तमंदिराजवळ एक ट्रक हा धामणगावकडून अहमदनगरकडे जात होता. रात्री १२ वाजेदरम्यान व्यंकटेश कंपनीकडे डाव्या बाजूने वळण घेत असताना ट्रकला पाठीमागून आलेल्या रुग्णवाहिकेने जोरदार धडक दिली.

या भीषण अपघातात रुग्णवाहिका चालक भरत सीताराम लोखंडे (वय ३५, रा. धामणगाव), मनोज पांगु तिरपुडे, पप्पू पांगु तिरखुंडे (दोन्ही रा. जाटदेवळा) यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघातामुळे वाहतूक काही काळ ठप्प झाली होती.

मयत व्यक्तींचे मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले तसेच अपघातग्रस्त वाहन बाजूला करून पोलिसांनी वाहतूक सुरळीत केली.

### आणखी एका अपघतात चौघांचा मृत्यू

*दौलावडगाव शिवारात रुग्णवाहिकेचा अपघात झाल्याची घटना समोर आली असतानाच आणखी एक भीषण अपघात झाल्याचे समोर आले आहे. बीडच्या जामखेड-अहमदनगर मार्गावरील आष्टा फाट्याजवळ ट्रॅव्हल्सचा भीषण अपघात गुरुवारी (दि. २६) पहाटे सकाळी ६ वाजता झाला. या अपघातामध्येदेखील चार जणांचा जागीच मृत्यू तसेच २५ प्रवासी जखमी झाले असून नऊ जण गंभीर आहेत. हा अपघात इतका भीषण होता की यामध्ये प्रवाशांना बाहेर काढताना मोठी कसरत करावी लागली.*

# लातूरमध्ये इमारतीला आग; तिघांचा मृत्यू

**लातूर : प्रतिनिधी**

लातूरमध्ये गुरुवारी (दि. २६) सकाळी एका इमारतीला भीषण आग लागून तीन जणांचा मृत्यू, तर तीन जण जखमी झाले आहेत. इमारतीच्या तळमजल्यावर फुलविक्री व मंडप डेकोरेशनचे दुकान आहे. या दुकानात शॉर्टसर्किट होऊन आग लागली.

काही क्षणांतच या आगीने उग्र रुप धारण केले आणि ही आग वरील दोन्ही मजल्यावर पोहचली. अशा परिस्थितीत काही समजायच्या आत या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर राहणारे शिवाजी लोंढे यांच्या कुटुंबियांना आग व धुराने लपेटले.

यामध्ये पत्नी कुसुमबाई शिवाजी लोंढे (वय ८०), मुलगा सुनील शिवाजी लोंढे (वय ५८) आणि सून प्रमिला सुनील लोंढे (वय ५०) वर्ष यांचा मृत्यू झाला. त्याचप्रमाणे याच इमारतीत राहत असलेल्या बीड येथील रहिवासी आणि लातूरमध्ये मेडिकलचे शिक्षण घेत असलेली अजरा अजिज सय्यद (वय २२), तिची आई जिनत फातेमा व भाऊ फहाद यांना आगीचे चटके बसून ते जखमी झाले आहेत.

या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या, वैद्यकीय पथक व पोलीस प्रशासन तातडीने दाखल झाले. त्याचप्रमाणे पोलीस अधिकारी घटनास्थळी हजर झाले आणि पुढील कार्यवाही सुरू झाली.

# गॅस पाईपलाईनचा मोबदला मिळण्यासाठी कर्जतमध्ये उपोषण

## शेतकऱ्यांचा अंत पाहू नका -राजेश भगत

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातून २०१८मध्ये नेण्यात आलेल्या रिलायन्स इथेन गॅस पाईपलाईन जमिनीखाली टाकण्यात आली होती. पाईपलाईन टाकण्यासाठी घेतलेल्या जमिनीचा मोबदला देण्यात आला नाही आणि तो मोबदला देण्यात यावा, अशी मागणी करण्यासाठी शेतकरी उपोषणाला बसले आहेत. या उपोषणाला १५ गावातील ५५ शेतकऱ्यांनी पाठिंबा दिला आहे. आता शेतकऱ्यांचा अंत पाहू नये; नाहीतर आता कायदा हातात घेऊन ही गॅस पाईपलाईन आमच्या शेतातून उघडून फेकून देऊ, असा इशारा भाजप तालुकाध्यक्ष राजेश भगत यांनी रिलायन्स व्यवस्थापनाला दिला आहे.



कर्जत तालुक्यातून २०१८मध्ये इथेन गॅस पाईपलाईन टाकण्यात आली आहे. त्यानंतर संबंधित गॅस पाईपलाईन आपल्या जमिनीमध्ये टाकणाऱ्या शेतकरी यांना रिलायन्स गॅस पाईपलाईन कंपनीकडून पूर्ण मोबदला दिला नाही. त्यामुळे १५ गावातील शेतकऱ्यांनी अनेक आंदोलन केली आहेत. गॅस पाईपलाईन गेली त्या ठिकाणी रास्ता रोको आणि कर्जत तहसील कार्यालयाबाहेर तीनवेळा उपोषण करूनदेखील न्याय मिळत नाही. त्यामुळे गुरुवारी शेतकरी केशव तरे यांनी कर्जत तहसील कार्यालयाबाहेर उपोषण सुरू केले आहे. तरे यांनी सुरू केलेल्या उपोषणाला तालुक्यातील गॅस पाईपलाईन गेलेल्या १५ गावातील शेतकरी यांनी पाठिंबा दिला आहे. ५५ शेतकरी यांनी या आमरण उपोषणाला साथ दिली असून न्याय मिळाल्याशिवाय उपोषण सोडणार नसल्याचा निर्धार सर्वांनी केला आहे.

उपोषण सुरू झाल्यानंतर आपल्या मागण्यांचे निवेदन शेतकऱ्यांनी कर्जत तहसीलदार डॉ. शीतल रसाळ यांना दिले. या वेळी भाजप तालुकाध्यक्ष राजेश भगत, सुनील गोगटे आदी उपस्थित होते.

### उपोषणकर्त्यांच्या मागण्या

*** ७/१२ उताऱ्यावरील जमीन अधिग्रहित शिक्क्याप्रमाणे प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना व्याजासह मोबदला मिळावा.**

*** अर्धवट मोबदला दिलेल्या शेतकऱ्यांना पूर्ण मोबदला मंजूर केल्याप्रमाणे दिला जावा.**

*** खोटे पंचनामे करणाऱ्या रिलायन्स प्रकल्प अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी.**

*** जर रिलायन्स ७/१२वरील शिक्क्याप्रमाणे मोबदला देणार नसेल तर आमच्या शेतजमिनीतून पाईपलाईन त्वरित काढावी आणि जमिनीवरील नोंद हटवा.**

*** जर या मागण्या मान्य न झाल्यास शेतकरी स्वतःच नाईलाजास्तव लाईन उखडून टाकणार आणि यास शासन आणि रिलायन्स प्रशासन जबाबदार राहणार.**

# कर्जतमध्ये सात सरपंचपदांसाठी २१, तर ६८ सदस्यपदांसाठी १६२ उमेदवार रिंगणात

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील सात ग्रामपंचायतींच्या थेट सरपंचपदासाठी ३७ अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी १६ अर्ज मागे घेण्यात आल्याने २१ उमेदवार रिंगणात आहेत. कळंब ग्रामपंचायतीच्या पोटनिवडणुकीसह ६८ सदस्यपदांसाठी २२४ अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी ६२ अर्ज मागे घेण्यात आल्याने १६२ उमेदवार प्रत्यक्ष निवडणूक लढवीत असून चार उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत, तर एका जागेवर कुणीही नामांकन पत्र दाखल न केल्याने त्या जागेवरची निवडणूक होणार नाही. या निवडणुकांसाठी ५ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे.

तालुक्यातील नसरापूर ग्रामपंचायतीच्या थेट सरपंचपदासाठी चार अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी दोन जणांनी माघार घेतल्याने एकास एक उमेदवार रिंगणात आहे. वदप ग्रामपंचायतीत सरपंचपदासाठी सहा अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी चार जणांनी माघार घेतल्याने दोन उमेदवार रिंगणात आहे. गौरकामतमध्ये सरपंचपदासाठी पाच अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी एकाने माघार घेतल्याने चौरंगी लढत होणार आहे. ओलमण ग्रामपंचायतीत सरपंचपदासाठी तीन अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी एकानेही माघार न घेतल्याने तिरंगी लढत होणार आहे. अंभेरपाडा ग्रामपंचायतीत सरपंचपदासाठी सहा अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी तिघांनी माघार घेतल्याने तीन उमेदवार रिंगणात आहेत. खांडस ग्रामपंचायतीत सरपंचपदासाठी सहा अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी तिघांनी माघार घेतल्याने तिरंगी लढत रंगणार आहे. नांदगावमध्ये सरपंचपदासाठी सात अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी तिघांनी माघार घेतल्याने चौरंगी लढत होणार आहे.




नसरापूर ग्रामपंचायतीमध्ये ११ सदस्यपदासाठी ३५ अर्ज वैध ठरले. त्यापैकी १३ जणांनी उमेदवारी मागे घेतल्याने २२ उमेदवार रिंगणात आहेत. वदप ग्रामपंचायतीमध्ये नऊ जागांसाठी २८ अर्ज वैध ठरले. त्यापैकी नऊ जणांनी उमेदवारी मागे घेतल्याने १९ उमेदवार रिंगणात आहेत. गौरकामतमध्ये नऊ जागांसाठी ३५ अर्ज वैध ठरले. त्यापैकी आठ जणांनी उमेदवारी मागे घेतल्याने २७ उमेदवार रिंगणात आहेत. ओलमण ग्रामपंचायतीमध्ये ११ जागांसाठी ३४ अर्ज वैध ठरले. त्यापैकी चार जणांनी उमेदवारी मागे घेतल्याने ३० उमेदवार रिंगणात आहेत. अंभेरपाडा ग्रामपंचायतीमध्ये सात जागांसाठी १९ अर्ज वैध ठरले. त्यापैकी १० जणांनी उमेदवारी मागे घेतल्याने नऊ उमेदवार रिंगणात आहेत.

खांडस ग्रामपंचायतीमध्ये ११ जागांसाठी ३६ अर्ज वैध ठरले. त्यापैकी १४ जणांनी उमेदवारी मागे घेतल्याने २२ उमेदवार रिंगणात आहेत. नांदगाव ग्रामपंचायतीमध्ये नऊ जागांसाठी ३३ अर्ज वैध ठरले. त्यापैकी चार जणांनी उमेदवारी मागे घेतल्याने २९ उमेदवार रिंगणात आहेत, तर कळंब ग्रामपंचायतीमधील एका जागेसाठी पोटनिवडणूक होत आहे तेथे दोन अर्ज वैध ठरल्याने सरळ लढत होत आहे.

पान १ वरुन

## धरणा कॅम्प येथील अदानी ॲग्रोला १० दिवसांचा अल्टीमेटम



नवी मुंबईचे माजी नगरसेवक निशांत पाटील, बदलापूरचे नगरसेवक आकाश राऊत, भोलाशेठ पाटील, शत्रुघ्न पाटील, लायन ग्रुप अध्यक्ष बाबूशेठ फडके, बेलपाडा माजी सरपंच सोमनाथ म्हात्रे, सागर पवार, सुनील म्हात्रे, अशोक साळुंखे, सुरेश पोरजी, नितेश पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ सहभागी झाले होते.

दरम्यान, या वेळी आंदोलनाचा पवित्रा पाहून व्यवस्थापन व पोलिसांकडून आंदोलकांना चर्चेसाठी आमंत्रित करण्यात आले. या प्रकल्पासाठी जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांच्या परिवारातील लोकांना कंपनीमध्ये प्रत्यक्ष रोजगार मिळावा, शक्य असेल त्या ठिकाणी शेतकऱ्यांना कामाचे कंत्राट द्यावे, कंपनीच्या जागेभोवती असणाऱ्या शेतकऱ्यांना बारमाही ॲक्सेस उपलब्ध असला पाहिजे तसेच या शेतकऱ्यांच्या जमिनीमधून कंपनीच्या ताब्यातील जमिनीकडे जाणारे पाणी, नैसर्गिकरित्या वाहणारे पाणी वाहून नेण्याची यंत्रणा कंपनीने उभी करावी, अशी मागणी या चर्चेत आमदार प्रशांत ठाकूर व शिष्टमंडळाने केली. त्याचप्रमाणे या अनुषंगाने तहसीलदार तसेच महापालिकेच्या संबंधित अधिकारी यांनी व्यवस्थापन यांच्यासमवेत बैठक घ्यावी. प्रकल्पाची उभारणी होत असताना येथील भूमिपुत्राला न्याय मिळालाच पाहिजे, मात्र कंपनी जर जुमानत नसेल तर आमचा कार्यकर्ता शांत बसणार नाही. हक्क मिळेपर्यंत लढतच राहणार असे सांगतानाच आमदार प्रशांत ठाकूर यांनी १० दिवसांचा वेळ व्यवस्थापनाला दिला आहे. अदानी व्यवस्थापन चालढकलपणा करीत असेल तर ते आम्ही सहन करणार नाही. व्यवस्थापनाने आडमुठी भूमिका घेतल्यास जशास तसे उत्तर देऊ, असा इशाराही त्यांनी व्यवस्थापनाला दिला आहे.

## दुखवटा

### र. य. पाटील

**पाली** : शिहू येथील सुपरिचित आणि सामाजिक क्षेत्रातील अग्रेसर व्यक्तिमत्व र. य. पाटील गुरुजी यांचे नुकतेच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७२ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने संपूर्ण कुटुंब आणि हितचिंतक यांच्यात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या अंत्ययात्रेसमयी विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### लक्ष्मण दाभणे

**मुरुड** : तालुका बौद्ध सेवा संघाचे माजी अध्यक्ष लक्ष्मण काळुराम दाभणे यांचे वयाच्या ९०व्या वर्षी वृद्धात्वाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पाच मुली व एक मुलगा, नातवंडे असा मोठा परिवार आहे. २ नोव्हेंबरला नांदगावच्या बौद्धवाडीत असलेल्या त्यांच्या निवासस्थानी जलदान विधी व शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे. अनेक मान्यवरांनी त्यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले.



# तळोजा लिंकरोडवर गतिरोधकाची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

रोडपाली वसाहतीलगतच्या रस्त्यावरील गतिरोधक तुटल्याने या ठिकाणी नेहमी अपघात घडत आहेत. त्यामुळे तळोजा लिंकरोडवर गतिरोधक बसवण्याची मागणी होत आहे.

रोडपाली तळोजा लिंकरोडवर स्थानिकांसह व्यावसायिक वाहनांची नेहमी वर्दळ असते. सायन-पनवेल महामार्गावरून तळोज्याला जातानाच्या रस्त्यावर रोडपाली वसाहतीलगतच्या रस्त्यावरील गतिरोधक तुटल्याने या ठिकाणी नेहमी अपघात घडत आहेत. या ठिकाणी परिसरातील वाहने मुख्य रस्त्यावर येण्यासाठी उपरस्ते जोडलेले आहेत. मुख्य रस्त्यावरून भरधाव वेगाने ये-जा करणाऱ्या वाहनांचा वेग नियंत्रित करण्यासाठी संबंधित ठिकाणी एकही गतिरोधक नसल्याने दररोज लहान-मोठे अपघात होत आहेत. त्यामुळे या रस्त्यावर तातडीने गतिरोधक बसविण्याची मागणी जोर धरीत आहे.

महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
विशुल गोल्फ फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६१३१६१००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

धारिका क्रमांक: डीआरए-०५२१/प्र.क्र.०३/२०२३/जाहिरात दिनांक :२६ ऑक्टोबर,२०२३

आयोगामार्फत शासनाच्या आस्थापनेवरील खालील संवर्गातील पद भरतीसाठी विहित ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत:-

| जाहिरात क्रमांक | विभाग | संवर्ग | एकूण पदसंख्या |
|---|---|---|---|
| ११६/२०२३ | उच्च व तंत्रशिक्षण विभाग | प्राचार्य/संचालक, शासकीय कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये/संस्था, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ | १२ |
| ११७/२०२३ | | प्राचार्य, शासकीय अध्यापक महाविद्यालय, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ | ०६ |
| ११८/२०२३ | मराठी भाषा विभाग | अनुवादक (मराठी), गट-क, भाषा संचालनालय | ०४ |
| ११९/२०२३ | | अनुवादक (हिंदी), गट-क, भाषा संचालनालय | ०३ |
| १२०/२०२३ | महसूल व वन विभाग | सहायक वनसांख्यिकी, गट-ब | ०७ |

२. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, प्रवर्गनिहाय तपशील, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, स्पर्धा परीक्षांच्या बाबतीत संबंधित परीक्षा योजना व अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in व https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे तसेच सविस्तर जाहिरातीचे कृपया अवलोकन करावे.
३. ऑनलाईन अर्ज https://mpsconline.gov.in या संकेतस्थळाद्वारे दिनांक ३० ऑक्टोबर, २०२३ ते दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.
४. आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.
ठिकाण : नवी मुंबई उप सचिव (जाहिरात), महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

## निवडक

### खारघर येथे तरुणाचा मृत्यू

**पनवेल :** एकविरा देवीच्या दर्शनासाठी निघालेल्या तरुणाचा ट्रकच्या चाकाखाली येऊन मृत्यू झाल्याची घटना मुंबई-पुणे मार्गावर खारघर येथे घडली. या अपघातानंतर ट्रकचालक पळून गेला. पोलिसांनी गुन्ह्याची नोंद केली असून त्याचा शोध सुरू आहे. सुमित परदेशी (वय १७) असे मृताचे नाव आहे. सुमित परदेशी आणि त्याचे मित्र अजय मागाडे, दीपक कांबळे, रवी कांबळे, रोनक चव्हाण हे लोणावळा येथे एकविरा देवीच्या दर्शनासाठी दुचाकीवरून जात होते. सुमित व अजय हे एका दुचाकीवर होते. मध्यरात्री त्यांची दुचाकी मुंबई-पुणे महामार्गावर आली असताना एका भरधाव ट्रकमुळे दुचाकीचा तोल गेला. त्यामुळे दुचाकी ट्रकच्या मागच्या चाकाखाली आली. यात सुमितच्या डोक्याला जबरदस्त दुखापत झाली. त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, पण डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

### जासई येथे तरुणीचे अपहरण

**पनवेल :** कपडे शिवण्यासाठी जात असल्याचे सांगुन घराबाहेर पडलेल्या १५ वर्षीय मुलीचे कायदेशीर



रखवालीतून अपनयन झाल्याची घटना जासई येथे घडली आहे. अनुशा हिरासिंग राठोड (वय १५) असे या मुलीचे नाव असून तूच रंग गोरा, उंची १५७ सेमी, अंगात नेसनीस गुलाबी रंगाचा पंजाबी ड्रेस, हातामध्ये कपडयाची पिशवी, सोबत मोबाईल फोन आहे. या तरुणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी उरण पोलीस ठाणे किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी हुलगे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### अत्रे कट्ट्यावर 'शूरां मी वंदिले'

**पनवेल :** सीमेवर प्राणांची बाजी लावून लढणार्या जवानांना अभिवादन म्हणून 'शूरां मी वंदिले' या कार्यक्रमाचे आयोजन नवीन पनवेल येथील अत्रे कट्ट्याने आपल्या दशकपूर्तीनिमित्त नवीन पनवेल येथील ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहात (पहिला मजला) केले असून सुप्रसिद्ध निवेदिका अनघा मोडक तो सादर करतील. रविवारी (दि. २९) सायंकाळी ६ वाजता होणारा हा कार्यक्रम सर्व रसिकांसाठी नि:शुल्क असून रसिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन आचार्य अत्रे कट्टा, नवीन पनवेलचे प्रमुख अरविंद कर्पे यांनी केले आहे.

# पनवेलमध्ये साथीच्या आजारांवर उपाययोजना

## बुधवार कोरडा दिवस पाळण्याचे महापालिकेचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासनाच्या व सहाय्यक संचालक आरोग्य विभाग उपसंचालकांच्या सुचनेप्रमाणे 'बुधवार' हा दिवस कोरडा दिवस म्हणून पाळण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्याप्रमाणे पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांनी 'बुधवार' हा दिवस कोरडा दिवस पाळावा, असे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.

सध्या सर्वत्र डेंग्यू, मलेरिया सारख्या साथजन्य रोगाचे रूग्ण दिसून येत आहेत या पार्श्वभूमीवरती वैद्यकिय आरोग्य विभागामार्फत किटकजन्य



आजराविषयी खबरदारी घेण्यासाठी जनजागृती विविध माध्यमांतून करण्यात येत आहे. महापालिकेने दिलेल्या सूचनांचे पालन करुन नागरिकांनी पुरेशी दक्षता बाळगल्यास या आजारांवर वेळीच प्रतिबंध घालणे शक्य आहे.

पावसाळ्यांनंतर विविध किटकजन्य रोगाचे प्रमाण वाढत असते. अशा वेळी नागरिकांनी पिण्याचे पाणी उकळून प्यावे. तसेच भाज्या, फळे इत्यादी वस्तू स्वच्छ धुवून मगच खाण्यासाठी वापराव्यात. सर्व केरकचरा घंटा गाडीतच टाकावा. घर व सभोवतालचा परिसर जास्तीत जास्त स्वच्छ ठेवावा. आपल्या इमारतीतील पाण्याची टाकी निर्जंतुक करावी. साचलेले पाणी, डबकी यातील पाणी वाट काढून वाहून जाईल अशी सोय करावी जेणे करून डास उत्पन्न होणार नाहीत. शिळे व उघड्यावरचे अन्न खाऊ नये, विहरीचे पाणी शुध्दीकरण करूनच पिण्यास वापरावे. अतिसार झाल्यास क्षारसंजिवनी मिश्रणाचा वापर करावा. घरांतर्गत डास उत्पत्तीस्थाने टाळण्यासाठी घरातील फुलदाणी मनीप्लँट, वॉटरकूलर इत्यादीमधील पाणी आठवड्यातून एक दिवस बुधवारी पुर्णपणे काढून कोरडे करून 'कोरडा दिवस' पाळावा, अशा सूचना वैद्यकिय आरोग्य विभागाचे मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी केले आहे.

जेवणापूर्वी व शौचास जाऊन आल्यानंतर हात साबणाने स्वच्छ धुणे, पुर्ण शिजवेले,ताजे अन्न खावे, रस्त्यांवरील उघडे अन्नपदार्थ खावू नये. ताप सर्दी, खोकला अशा प्रकारची लक्षणेअसल्यास नजिकच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा.

हिवताप, डेंगू, मेंदूज्वर, चिकनगुनिया, मलेरिया असे साथीचे रूग्ण आपल्या आसपास आढल्यास जवळच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राशी किंवा रूग्णालयाशी संपर्क साधावा. रूग्णालयांनी, प्रयोगशाळांनी साथीच्या रोगाचे रूग्ण महापालिकेला idsppanvelcorporation@gmail.com या ईमेलआयडीवरती कळवावे, असे आवाहन वैद्यकिय आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# काळुंद्रे गावात बसविले गतिरोधक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

काळुंद्रे गावात माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी नगरसेवक अजय बहिरा यांच्या पाठपुराव्यामुळे गतिरोधक बसवण्याचे काम पूर्ण झाले आहे.

पनवेल महापलिका हद्दीमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली अनेक विकसाची कामे मार्गी लावण्यात येत आहेत. त्यानुसार काळुंद्रे गावातील नागरीकांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून माजी नगरसेवक





### अजय बहिरा यांचा यशस्वी पाठपुरावा

अजय बहिरा यांनी गतीरोधक बसण्याची मागणी माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडे केली होती. या मागणीची दखल घेऊन परेश ठाकूर यांनी पाठपुरावा सुरू करून हे काममार्गी लावले आहे. त्यानुसार सेक्टर २१ मधील गावातील प्रमुख रस्ता तसेच कॉलनीतील चौकामध्ये अश्या तेरा ठिकाणी गतिरोधक बसवण्याचे काम माजी नगरसेवक अजय बहिरा यांच्या उपस्थितीत झाले.

या वेळी माजी नगरसेवक अजय बहिरा, भाजपनेते शंकर म्हात्रे, बाळा चिखलेकर, विशाल म्हसकर, सचीन चिखलेकर, रूपेश परदेशी उपस्थित होते.

## नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत सायबर गुन्हे जनजागृती मोहीम

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत सायबर गुन्हे जनजागृती करण्यासाठी व सायबर गुन्ह्यांस प्रतिबंध करण्यासाठी माझं शेजार व माझी जबाबदारी ही संकल्पना राबविण्यात येत असुन या संकल्पने अंतर्गत सायबर जनजागृती मोहिम राबविण्यात येत आहे.

आपली शाळा, महाविद्यालय, सोसायटी, सामाजिक संस्था, सार्वजनिक मंडळे, स्वयंसेवी संस्था (एनजीओ) यांचेकरीता सायबर गुन्हे जनजागृती कार्यक्रम राबविण्याचा असल्यास किंवा सायबर गुन्ह्यांबाबत कोणतीही माहिती प्राप्त करावयाची असल्यास किंवा सायबर गुन्ह्यांसंदर्भात नवी मुंबई पोलीसांशी संपर्क करायचा असल्यास QR कोड स्कॅन करा किंवा दिलेल्या नंबरवर संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# परदेशी नोकरीचे प्रलोभन दाखवून कळंबोलीतील तरुणांची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

परदेशामध्ये लाखो रुपयांची नोकरी लावण्याची जाहिरात करून कळंबोली वसाहतीमध्ये कार्यालय थाटले, बेरोजगार उमेदवारांकडून लाखो रुपये जमवले आणि भामटा रातोरात पळून गेल्याने कळंबोली परिसरातील तरुणांमध्ये एकच खळबळ माजली आहे. अनेक तरुणांनी फसवणूक झाल्याबाबत तक्रार पोलिसांत दिली.

या प्रकरणी अजून संशयीत आरोपी पोलिसांच्या हाती सापडलेला नाही. या प्रकरणातील पहिली तक्रार पिडीत उमेदवाराने नऊ लाख रुपयांची फसवणूक झाल्याची दिली आहे. पुढील काही दिवस फसगत झालेल्या तरुणांना एकत्र करुन त्यांच्या प्रत्येकाची तक्रार दाखल करण्याची कार्यवाही पोलीस ठाण्यात सूरू आहे.

परदेशात लाखो रुपयांचा पगात असल्याची नोकरी लावतो, मुलाखतीमध्ये फक्त उत्तीर्ण व्हा, असा बहाणा करुन शेकडो तरुणांना नोकरीचे आमिष दाखविले, मात्र वर्ष उलटले तरी नोकरी लागत नसल्याने संबंधित कंपनीच्या कार्यालयाच्या खेट्या मारल्यानंतर संशयीत भामटा पळाला. अखेर वैतागलेल्या तरुणांनी थेट पोलीस ठाणे गाठले. यामुळे शेकडो तरुण आणि




त्यांचे कुटूंबिय हवालदिल झाले आहे. याबाबत दोन दिवसांपूर्वी कळंबोली पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली आहे. एका तक्रारीनंतर अनेक उमेदवारांनी पोलिसांकडे संपर्क साधला. कॅनडा, पोर्तुगाल व इतर देशांमध्ये क्लार्क व इतर पदांवर नोकरी लावून तेथेच राहण्याची कंपनीच्यावतीने सोय करू असे आश्वासन कळंबोली येथील एका भामट्याने तरुणांना दिले होते.

कळंबोली येथील ३९ वर्षीय बलजीत सिंग या तरुणाची अशीच फसगत या भामट्याने केली आहे. कॅनडा येथे बलजीत सींग यांना नोकरी मिळेल या आशेने सींग यांनी वसाहतीमधील सेक्टर ११ येथील वास्तुशांती या इमारतीमधील ग्लोबल इंटरनॅशनल एज्युकेशन सेंटर ॲण्ड ज्युनीअर एज्युकेशन सर्व्हीसेस या कंपनीतील व्यक्तीला धनादेशाने नऊ लाख रुपये नोकरी लावण्यासाठी दिले. मागील वर्षी ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात घेतलेली रकमेनंतर नोकरी लागली नाही. तसेच दिलेली रक्कम परत मागीतल्यानंतर ती परत मिळाली नाही. त्यामुळे सींग यांनी पोलीस ठाणे गाठले. सिंग यांच्यासह असंख्य तरुणांनी पोलीस ठाण्याकडे दाद मागीतली. काही तरुण पंजाब येथूनही याच कार्यालयाने फसवणूक केल्याचे सांगत आहेत.

मंगेश यादव या रिक्षाचालकाने पोर्तुगालमध्ये एक लाख रुपये महिन्याला पगार मिळेल या अपेक्षेने संबंधित कार्यालयात पन्नास हजार रुपये जमा केले होते. यादव यांना जमा केलेल्या रकमेची संबंधित कार्यालयाच्यावतीने पावती दिली होती, मात्र वर्ष उजाडले तरी नोकरी काही लागली नाही.

कळंबोली पोलिसांनी या घटनेनंतर फसवणूक झालेल्या तरुणांना पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. तसेच अशा फसवणूकीबाबत इतर नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.



**पनवेल : महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्या पाठपुराव्यामुळे शहरातील लोकनेते दि. बा. पाटील शाळेसमोरून जाणाऱ्या गावदेवी मंदिरपर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले आहे. महापालिकेच्या वतीने हे काम सुरू असताना माजी नगरसेविका दर्शना भोईर, सपना पाटील, केदार भगत, तुषार कापरे आदी उपस्थित होते.**



**खारघर : सेक्टर ११ राधाकृष्ण सोसायटी येथे नवरात्रीच्या नवव्या दिवशी आयोजित कन्याभोज व हळदी कुमकुम कार्यक्रमात भाजप उत्तर रायगड जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल यांनी उपस्थित राहून सर्वांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमावेळी सोसायटीचे सचिव मनोज कहर, भाजप ज्येष्ठ नागरिक सेलचे उपाध्यक्ष प्रकाश फाटक, रिया फटक आदी उपस्थित होते.**

# चिर्ले ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी रंजिता पाटील

**उरण : रामप्रहर वृत्त**

चिर्ले ग्रामपंचायतीच्या निवडणुकीमध्ये गुरुवारी (दि. २६) भाजप-काँग्रेस युतीच्या रंजिता जितेंद्र पाटील या विजयी झाल्या.

चिर्ले ग्रामपंचायतीमध्ये भाजप व काँग्रेस या दोन पक्षाची युती असून ११ पैकी ०७ सदस्य हे युतीचे निवडून आलेले आहेत. राजन घरत यांनी उपसरपंच पदाचा राजीनामा दिल्या नंतर सरपंच सुधाकर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आजची निवडणूक पार पडली.

रंजिता पाटील व सहकारी सदस्य यांनी सकाळी चिर्ले श्रीराम मंदिरात व हुतात्मा नामदेव शंकर घरत यांना अभिवादन करून अर्ज दाखल केला, तर शेकापचे सदस्य आकाश टकले यांनी त्यांचा अर्ज दाखल केला. त्यामुळे झालेल्या निवडणुकीमध्ये रंजिता पाटील यांना ०७ मते तर आकाश



टकले यांना सरपंचांच्या मतावर ०५ मते पडली. त्यामुळे रंजिता पाटील यांना विजयी घोषित करण्यात आले.

या वेळी कामगार नेते जितेंद्र घरत, युवा नेते समीर मढवी, हिराजी पाटील, अनंत ठाकूर, दीपक पाटील, संतोष पाटील, विनोद पाटील, विराज मढवी, जयेश पाटील, विश्राम मोहीते यांनी उपसरपंच रंजिता पाटील यांचे अभिनंदन केले.

माजी उपसरपंच व विद्यमान सदस्य राजन घरत, प्राजक्ता गोंधळी, रोशनी मोहीते, राजेश पाटील, श्रीकांत पाटील, अस्मिता पाटील हे सर्व सदस्य युतीच्या उमेदवार रंजिता पाटील यांच्यासोबत ठाम उभे राहून विजयी केल्याबद्दल त्यांचेसुद्धा अभिनंदन केले.

# उरणच्या सीड्स स्कूलमध्ये दसरा उत्साहात

**उरण : वार्ताहर**

उरण एज्युकेशन सोसायटीस्लिटिल सिड्स इंटरनॅशनल प्री-स्कूलमध्ये मंगळवारी (दि. २४) 'दसरा' उत्साहात साजरा करण्यात आला. दरवर्षी दसऱ्याच्या दिवशी पूर्व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांकडून पाटीवर सरस्वतीचे चित्र काढून त्यावर फुले व हळदकुंकू वाहून पाटीपूजन केले जाते.

यु.ई.एस. संस्थेचे उपाध्यक्ष मिलिंद पाडगांवकर ह्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यांच्यासोबत खजिनदार चंद्रकांत ठक्कर, सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या डॉ. मिनाक्षी गुप्ता, स्कूल व ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या सिमरन दहिया, सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख तसेच माध्यमिक, प्राथमिक, पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका, समन्वयक व सर्व शिक्षक तसेच पालक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला पूर्व प्राथमिक विभागातील एका शिक्षिकेने दसरा का साजरा केला जातो ह्याची माहिती सांगितली. त्यानंतर संगीत शिक्षिकेच्या मार्गदर्शनाखाली एक सुंदरशी सरस्वती वंदना इयत्ता सहावीच्या विद्यार्थांनी सादर केली. त्यांना



ढोलकीची साथ माध्यमिक विभागाच्या दोन विद्यार्थ्यांनी दिली.

संस्थेचे उपाध्यक्ष मिलिंद पाडगांवकर यांनी आपल्या मनोगतातून सर्वांना दसऱ्याच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. ह्या संपूर्ण कार्यक्रमातील उपस्थितांचे स्वागत, सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन पूर्व प्राथमिक विभागातील शिक्षिकांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी शाळेतर्फे विद्यार्थी व पालकांना मिठाईचे आणि आपट्याच्या पानाच्या प्रतिकृतीचे वाटप करण्यात आले. अशा रितीने उरण एज्युकेशन सोसायटीस् लिटिल सिड्स इंटरनॅशनल प्री-स्कूलमध्ये दसरा उत्साहात साजरा करण्यात आला.

## संपादकीय

# आंदोलन चिघळवू नये

राज्यात मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून वातावरण पुन्हा एकदा चांगलेच तापू लागले आहे. राज्यातील शिंदे-फडणवीस-पवार सरकार न्यायालयात टिकणारे मराठा आरक्षण देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करीत असताना या आरक्षणासाठीचे आंदोलन चिघळल्यास त्यातून कुणाचे भले होणार?

**मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला दिलेली ४० दिवसांची मुदत २४ तारखेला संपली, मात्र त्याआधीच राज्यभरातील अनेक जिल्ह्यांमध्ये राजकीय नेत्यांना या प्रश्नी गावबंदी करण्यात आली असून या साऱ्यातून गटागटांमध्ये वाद निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्था परिस्थिती बिघडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. वास्तविक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दसरा मेळाव्यात छत्रपती शिवाजी महाराजांना साक्ष ठेवून मराठा आरक्षण देण्यास आपण कटिबद्ध असल्याची भूमिका जाहीर केली होती, परंतु तरीदेखील जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी बुधवारपासून पुन्हा एकदा जालना जिल्ह्यातील आंतरवली सराटी येथे आमरण उपोषणाला सुरुवात केली. दुसऱ्या दिवशी त्यांनी वैद्यकीय तपासणीसदेखील नकार दिला. दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे बुधवारी दुपारी तातडीने दिल्लीला रवाना झाल्याने ते मराठा आरक्षणासोबतच मंत्रिमंडळ विस्तार, अपात्रता सुनावणी आदी विविध मुद्यांवर केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्याशी चर्चा करतील असे सांगितले जात होते. मराठा आरक्षणाच्या पेचामुळे मंत्रिमंडळ विस्तार रखडल्याची चर्चाही गुरुवारी सुरू झाली. दरम्यान, आजवर शांततापूर्ण आंदोलन म्हणून नावाजले गेलेले मराठा आरक्षण आंदोलन यापुढे वेगळे वळण घेईल की काय अशी चिंता आता व्यक्त होऊ लागली आहे. अनेक गावांमध्ये राजकीय नेत्यांना गावबंदी करण्यात आल्याचे फलक लागले आहेत. काही राजकीय नेत्यांनी याविषयी नाराजी व्यक्त केली असून यातून निरनिराळ्या पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये संघर्ष होण्याची भीती आहे. एकीकडे मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून वातावरण तापलेले असतानाच आत्महत्यांचे सत्रही सुरूच दिसते आहे. मराठवाड्यातील आणखी दोन तरुणांनी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आत्महत्या केल्याची माहिती गुरूवारी समोर आली. वास्तविक सरकार मराठा आरक्षणासाठी पूर्णपणे सकारात्मक असून कोणीही आत्महत्येचा मार्ग स्वीकारू नये असे आवाहन मुख्यमंत्री शिंदे यांनी केले आहे. तरीही तरुण आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलताना दिसत आहेत. आरक्षणासाठी कुणीही आत्महत्या करू नका, कुणीही उग्र आंदोलन करू नका, असे आवाहन जरांगे पाटील यांनीही बुधवारी केले. प्रत्यक्षात मात्र मराठा आंदोलनातील तरुण आक्रमक झाल्याचे दिसून आले. मराठा क्रांती ठोक मोर्चाच्या काही कार्यकर्त्यांनी थेट प्रसिद्ध वकील गुणरत्न सदावर्ते यांच्या वाहनांची प्रचंड मोडतोड केली. या वेळी त्यांनी 'एक मराठा लाख मराठा' अशा घोषणाही दिल्या. पोलिसांनी या तीनही तरुणांना अटक केली आहे. आंदोलनाला हे काहीसे हिंसक वळण लागलेले असतानाच विरोधकांनी मात्र आगीत तेल ओतण्याचे आपले काम सुरूच ठेवले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी राज्यात आलेले असताना, त्यांनी जरांगे पाटील यांची भेट घेऊन मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडवावा, अशी मागणी उद्धव ठाकरे यांच्यासारख्या दीर्घ राजकीय कारकीर्द असलेल्या नेत्याने करावी याला काय म्हणावे! मराठा आरक्षणाबद्दल राज्यातील सरकार पूर्णत: अनुकूल आहे. न्यायालयात टिकणारे आरक्षण मराठा समाजाला मिळावे याकरिता सर्वतोपरि काळजी घेऊन तोडगा काढण्याच्या प्रामाणिक प्रयत्नात राज्यातील सरकार असताना आरक्षणासाठीचे हे आंदोलन चिघळवण्याचा प्रयत्न कुणीही करता कामा नये.**

# अतिधोकादायक पुलांना पर्यायी पूल हवा!



खबरबात
प्रकाश सोनवडेकर

मुंबई-गोवा महामार्गावरील महाड येथील सावित्री नदी वरील ब्रिटीशकालीन पूल २ ऑगस्ट २०१६ रोजीसवाहून गेला. या दुर्घटनेनंतर पूलावरून पडून दोन बस आणि एक टव्हेरा गाडी वाहून गेली. यात ४२ जणांचा मृत्यू झाला. दोन वर्षापूर्वी अतिवृष्टीमुळे रायगड जिल्ह्यातील मुरूड तालुक्यातील काशिदजवळील पूल वाहून हेला. त्यामुळे जुन्या पुलांच्या दुरूस्तीची चर्चा सुरू झाली आहे, परंतु रायगड जिल्ह्यातील जुन्या पुलांचा प्रश्न अजून सुटलेला नाही. अनेक पुल आजही धोकादायक स्थितीत आहेत. या पुलांची दुरूस्ती व्हायला हवी. जेथे शक्य आहे तेथे पर्यायी पुला बांधायला हवेत. अतिधोकादायक पुलांच्या दुरुस्ती करण्याबाबत ठोस निर्णय घ्यायला हवा.

रायगड जिल्ह्यात मुंबई-गोवा महामार्गावर पनवेल व महाड उपविभागात १३ लहान ब्रिटीशकालिन पूल आहेत. तर काळ आणि गांधारी नदीवर मोठे ब्रिटीश कालिन पूल आहेत. कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग अलिबाग यांच्या कार्यक्षेत्रात राज्यमार्गावरील १३९ पूल आणि जिल्हा मार्गावंरील ७९ पूलांचा समावेश आहे. यातील रेवदंडा साळाव खाडीवरील पूल, सहानपाल्हे पूल, अलिबाग-रेवस मार्गवरील वरसोली येथील खडताळ पूल हे जून पुल आहेत.

अलिबाग, मुरूड तालुक्यात ४४ लहान २५ मोठे असे एकूण ६९ पुल आहेत. यापैकी १३ पुलाचे स्ट्रकचर ऑडिट करण्यात आले असून आठ पुल धोकादायक असल्याचे निष्पन्न झाले आहे. रेवदंडा, खडताळ, एकदरा, आवास, सासावने, सहण पाले, नवेदर बेली हे आठ पुल धोकादायक आहेत. या पुलाची पुनर्बांधणी करण्यासाठी गत वर्षी प्रस्ताव पाठविण्यात आले होते. पुलाच्या कामासाठी बजेटमध्ये निधीची तरतूद करण्यात आली आहे. रेवदंडा, खडताळ पुलासाठी दहा कोटी, एकदरा पाच कोटी, सहान पाले साडे सात कोटी, आवास अडीच कोटी तर सासवणे पुलासाठी ऐंशी लाख पुनर्बांधणी कामासाठी खर्च होणार आहे. रेवदंडा, एकदरा पुलाच्या कामासाठी निविदा काढण्यात आली आहे. तर उर्वरित पुलासाठी प्रक्रिया सुरू आहे. यामध्ये रेवदंडा पुलाचे काम हे पावसाळ्यापूर्वी पूर्ण झाले आहे, मात्र उर्वरित पुलाच्या कामाचे सुरूच झालेले नाही.

अलिबाग-रेवस मार्गावर खडताल पुल हा ब्रिटिश कालीन आहे. याचेही ऑडिट झाले असले तरी अद्याप या पुलाचे काम सुरू झालेले नाही. या पुलाची केवळ डागडूजी केली जाते. अलिबाग-रेवस या मार्गावरून सद्या होत असलेली वाहतूक आणि भविष्यात होणारी विकासकामे पाहाता जुन्या खडताळ पुलाला नवीन पर्यायी पूल उभारणे ही काळाची गरज आहे. या पुलांवर एखादी दुर्घटना होऊन त्यात कुणाचा तरी बळी गेला की या पुलांच्या कामांना सुरूवात करणार का असा प्रश्न पडतो. काशीद येथील पुलाची दुरूस्ती व्हावी, अशी मागणी केली जात होती. त्याकडे दुर्लक्ष केले गेले. अखेर हा पुल वाहून गेला. त्यानंतर येथे नवीन पुल बांधण्यात आला.

जल्ह्यातील अनेक पूल आजही धोकादायक अवस्थेत आहेत या पूलांच्या दुरूस्तीबाबत तातडीने निर्णय घेणे गरजेच आहे. हे पूल तुटल्यास त्याचा मोठा फटका रस्ते वाहतूकीवर होणार आहे. या दुर्घटनेत निष्पाप लोकांचे प्राणही जाऊ शकतात. जिल्ह्यात अनेक पूल ब्रिटीशकालीन आहेत. काही स्वातंत्र्यनंतर बांधण्यात आले आहेत. त्यातील काही पूल धोकादायक स्थितीत आहेत. यापैकी काही पूल अतिधोकादायक आहेत. या पुलांची तातडीने दुरुस्ती करायला हवी.

कोकण रेल्वे मार्गावर निवसर येथे भराव टाकण्याऐवजी तेथे पूल बांधण्यात यावा अशी तेथील स्थानिक लोकांनी सांगितले होते. परंतु त्याकडे दुर्लक्ष करून भराव टाकण्यात आला. त्याचे परिणाम कोकण रेल्वेला भोगावे लागले. त्यामुळे लोकांच्या सुचनांचादेखील सरकारी अधिकाऱ्यांनी विचार करायाला हवा. आपल्यालाच सर कळत अशा तोपर्यंत राहू नये. स्थानिक लोंक ज्यावेळी एखादी तक्रार करतात त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष नकरता त्यावर कार्यवाही करायला हवी. एखाद्या पुलाबाबत स्थानिकांनी तक्रार केली असेल तर त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

काशीद येथील दुर्घटनेनंतर जिल्ह्यील अनेम पुलाचे स्ट्रक्चरल ऑडट झाले. काही पुल धोकादायक असलल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे या पुलांच्या दुरूस्तीसाठी निधी मंजुर झालेला. असे असताना दखील जर पुलांच्या कामांना सुरूवात होत नसेल तर कुठेतरी पाणी मुरतय अस सामजायला हव. पुलांच्या दुरूस्तीच्या बाबतील दुर्लक्ष करता कामानये. पुलांची दुरूस्ती करायलाच हवी. अतिधोकादायक पूलांच्या दुरूस्तीचे काम तातडीने सुरू करायला हवे. जेथे आवश्यक आहे तेथे केवळ डागडूजी नकरता तेथील जुन्या पुलाला पर्यायी नवीन पुल बांधायला हवा.






## iPhone15ला C-Type केबलने चार्जिंग करता येतं?



Apple iPhone १५ सीरीज अलीकडेच लॉंच झाली आहे आणि वापरकर्ते उत्साहाने ते खरेदी करत आहेत. iPhone 15, iPhone 15 Plus, iPhone 15 Pro किंवा iPhone 15 Pro Max सर्वच फोनची विक्रमी विक्री सुरू आहे. सर्व मॉडेल्सची मोठ्या प्रमाणात विक्री होत आहे. यावेळी, आयफोन १५ सीरीजमधील लाइटनिंग पोर्ट काढून टाकण्यात आला आहे आणि त्याच्या जागी सी प्रकारचा चार्जिंग पोर्ट देण्यात आला आहे. अशा परिस्थितीत, आयफोन १५ सीरीजचा फोन Android च्या C-Type ने चार्ज करता येईल का, असा प्रश्न काही लोकांच्या मनात निर्माण होत आहे. अशा परिस्थितीत आज आम्ही तुम्हाला याबाबत योग्य माहिती देणार आहोत जेणेकरून तुमचे कोणतेही नुकसान होऊ नये.


**अँड्रॉइड चार्जरने आयफोन चार्ज करता येईल का?**

तुम्ही तुमच्या ळझहेपश १५ ला कोणत्याही -पर्वीळव उ प्रकारच्या केबलने चार्ज करू शकता आणि हे पूर्णपणे खरे आहे. इतकंच नाही तर C टाइप पॉवर बँक वापरून तुम्ही तुमचा iPhone १५ देखील चार्ज करू शकता आणि या सीरिजमध्ये उपस्थित असलेले सर्व फोन या पद्धतींद्वारे चार्ज केले जाऊ शकतात. हे फक्त आयफोनच्या मदतीने करता येते असे कोणी तुम्हाला सांगितले तर त्यावर अजिबात विश्वास ठेवू नका.

**'या' गोष्टींची घ्या विशेष काळजी**

तुम्ही तुमचा iPhone 15 कोणत्याही Android स्मार्टफोनच्या चार्जरने चार्ज करू शकता जर ते Type C ला सपोर्ट करत असेल, परंतु एक अट आहे जी तुम्ही स्वीकारणे खूप महत्वाचे आहे. तुम्ही जी काही बॅटरी किंवा चार्जर वापरत आहात ती कंपनीने प्रमाणित केलेली असावी आणि ती डुप्लिकेट किंवा लोकल नसावा. कारण असे झाल्यास तुमच्या ळझहेपश १५ मध्ये फोन गरम होण्याच्या समस्या दिसू शकतात. तसेच जास्त काळ चार्जिंग सुरू राहिल्यास आयफोनची बॅटरी ओव्हरचार्ज होऊन ती खराब होण्याचीही शक्यता आहे.

# कवी भास्कर रामचंद्र तथा भा. रा. तांबे



निमित्त

भास्कर रामचंद्र तांबे हे प्रसिद्ध मराठी कवी होते. त्यांचा जन्म २७ ऑक्टोबर १८७३ रोजी मध्य भारतात मुंगावली (मुगावली) येथे झाला. शिक्षण झांशी आणि देवास येथे झाले. १८९३ मध्ये प्रवेशपरीक्षा पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले परंतु आर्थिक प्रतिकूलतेमुळे उच्च शिक्षण घेता आले नाही. मध्य भारतातच अनेक वेगवेगळ्या ठिकाणी युवराजशिक्षक, दिवाण, पोलिस-सुपरिंटेंडंट, सरकारी वकील, न्यायाधीश, शिक्षणखात्यात परीक्षा विभागाचे रजिस्ट्रार इ. नोकऱ्यांमध्ये जीवन व्यतीत झाले. १९३७ मध्ये ग्वाल्हेर संस्थानाचे राजकवी झाले.

काव्यास विशेष अनुकूल नसणाऱ्या व्यवसायांतही तांब्यांचा काव्यलेखनाचा छंद कायम राहिला. इंग्रजी स्वच्छंदतावादी संप्रदायाचे कवी, टेनिसन-ब्राउनिंग हे पुढील कवी, जयदेव हा संस्कृत कवी तसेच रवींद्रनाथ टागोर यांच्या काव्याचे संस्कार त्यांच्यावर वेळोवेळी होत गेलेपरंतु त्यांच्या कवितेचे मुख्य स्वरूप गीतांचे, भावगीतांचे राहिले. ब्राउनिंगच्या नाट्यात्मक एकभाषितांप्रमाणे त्यांनी मराठीमध्ये प्राचुर्याने नाट्यगीते लिहिली.

त्यांच्या गीतपद्धतीची छाप रविकिरणमंडळातील कवी आणि बोरकर, कुसुमाग्रजादी पुढील कवींवरही पडली. केशवसुतादी अर्वाचीन कवितेच्या प्रणेत्यांहून स्वतंत्र राहूनच तांबे यांनी आपली स्वच्छंदतावादी कविता लिहिली. संदेश देण्याचा अभिनिवेश त्यांनी बाळगला नाही. स्वतःचे प्रेमसंतृप्त जीवन आणि इतरांच्या प्रेमाबद्दलची आस्था ह्यांतून त्यांची बहुतेक नाट्यगीते निर्माण झाली आहेत. परमेश्वरावर त्यांची दृढ श्रद्धा होती. त्यांतून काही 'अनुभवा'ची कविता त्यांच्याकडून लिहिली गेली परंतु आध्यात्मिकतेचे स्तोम त्यांनी माजविले नाही. सुनीतरचनेमध्ये केशवसुतांना त्यांनी साथ दिली तथापि तीमध्ये त्यांचे मन विशेष रमले नाही. एक सौंदर्यवादी आणि स्वतंत्र प्रतिभेचा कवी म्हणून त्यांचे अर्वाचीन कवींमधील स्थान फार वरचे आहे. त्यांनी रूढ केलेला गीतसंप्रदाय हा तांबेसंप्रदाय म्हणूनही ओळखला जातो.

त्यांची कविता प्रथम संग्रहरूपाने १९२० मध्ये रसिकांपुढे आली, नंतर दुसरा भाग १९२७ साली आणि समग्र कविता १९३५ साली प्रकाशित झाली. तीत एकुण २२५ कविता आहेतकाही हिंदी कवितांचाही त्यात अंतर्भाव आहे. तीनही संग्रहांस अनुक्रमे मायदेव, अज्ञातवासी आणि माधव जूलियन हे कवीच संपादक लाभले. स्वतः तांबे हे मात्र आपल्या कवितेच्या प्रसिद्धीबाबत बेफिकीर असत. तांबे ह्यांना संगीताचे चांगले ज्ञान होते व त्यांच्या अनेक कवितांवर, त्या कोणत्यारागांत गायिल्या जाव्यात, ह्यासंबंधीच्या सूचना त्यांनी देऊन ठेवलेल्या आहेत. तांब्यांचे काव्यविषयीचे गद्यलेखनही लक्षणीय आहे.

१९२६ मध्ये भरलेल्या मध्यभारतीय कविसंमेलनाचे ते अध्यक्ष होते. १९३२ मध्ये कोल्हापूर येथे भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनांतर्गत कविसंमेलनाचे ते अध्यक्ष होते. ग्वाल्हेर येथे ते ७ डिसेंबर १९४१ रोजी निधन पावले.

**(साभार : विश्वकोषमराठी)**


क्लिक...क्लिक...!



**माथेरान : हरित तृणांनी बहरलेले मखमालीचे डोंगर सर्वत्र दिसतात. निसर्गाची ही किमया रायगड जिल्ह्यातील माथेरानमध्ये हमखास पहावयास मिळते. हिरवेगार डोंगर नवा साज चढवून सोन्यासारखे दिसत आहेत.**

## आरोग्य प्रहर

# शुगर वाढली असेल, तर 'या' गोष्टी करा!




सध्याच्या काळात बहुतेक लोकांना डायबिटीसची समस्या असते. ताण तणाव, धावपळीचे जीवन, अनहेल्दी आहार अशा अनेक गोष्टींमुळे मधुमेहाची समस्या लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसते. तर डायबिटीसची समस्या झाल्यानंतर ती नियंत्रणात आणण्यासाठी आपल्या शरीराची काळजी घेणे खूप गरजेचे असते. डायबिटीस झाल्यानंतर निष्काळजीपणा अजिबात करू नये. आपल्या रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात आणण्यासाठी व्यायाम करणं, योग्य आहार घेणं, वेळेत औषध घेणे खूप गरजेचे असते.

जर तुमची शुगर अचानक वाढली तर अशावेळी उच्च फायबरयुक्त अन्न खा. यामुळे तुमची साखर नियंत्रणात आणण्यास मदत होईल. तुमच्या रक्तातील साखरेचा संबंध हा बद्धकोष्ठतेशी असतो. जर तुमचे पोट नीट साफ होत नसेल तर तुमच्या रक्तातील साखर वाढू शकते, त्यामुळे अशावेळी फायबरयुक्त पदार्थांचे सेवन करणे खूप गरजेचे असते. फायबरयुक्त पदार्थ तुमच्या शरीरासाठी खूप फायदेशीर ठरतात तसेच तुमची शुगर नियंत्रणात आणण्यास मदत होते.

भरपूर पाणी प्या-जर तुम्हाला डायबिटीसचा त्रास असेल आणि शरीरातील साखरेची पातळी नियंत्रणात आणायची असेल तर भरपूर पाणी पिणे गरजेचे आहे. पाणी तुमची शुगर नियंत्रणात आणण्यास मदत करते. पाणी हे इन्सुलिनच्या कार्याला प्रभावीपणे प्रोत्साहन देते. त्यामुळे पाणी पिल्यामुळे आपली अचानक वाढलेली शुगर अगदी कमी वेळात नियंत्रणात येण्यास मदत होते. त्यामुळे भरपूर पाणी आपल्या शरीरासाठी फायदेशीर ठरते.

शरीरातील साखरेची पातळी नियंत्रणात आणण्यासाठी व्यायाम करणं खूप गरजेचं आहे. व्यायाम हा आपल्या शरीरासाठी फायदेशीर ठरतो. व्यायाम केल्यामुळे आपल्या शरीराची हालचाल होते आणि त्यामुळे आपल्या शरीराला उर्जा मिळते, स्नायू मजबूत होतात, रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास मदत होते. त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात येण्यास मदत होते.

# महिलांचे सर्वच क्षेत्रांतील काम कौतुकास्पद -पालकमंत्री उदय सामंत

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जिल्हा पोलीस दलाच्या वतीने नवदुर्गा सन्मान सोहळा २०२३ अंतर्गत पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन बुधवारी (दि. २५) नागोठणे येथे करण्यात आले. या वेळी उद्योगमंत्री व पालकमंत्री उदय सामंत, महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, रोहा उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांची प्रमुख उपस्थित होती. या कार्यक्रमात मंत्री अदिती तटकरे यांसह सामाजिक, शासकीय, पोलीस, वैद्यकीयसह विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या १८ महिलांचा नवदुर्गा पुरस्काराने सन्मान करण्यात आला.



विविध क्षेत्रातील १८ नवदुर्गांचा सन्मान

सन्मानित करण्यात येणाऱ्या नवदुर्गांचे कौतुक करताना पालकमंत्री उदय सामंत म्हणाले, पोलीस दलात देखील विविध पदांवर कार्यरत राहून आमच्या महिला भगिनी उत्तम कामगिरी बजावत असून त्या दुर्गामातेचा अवतार आहे. मुलींना स्वसंरक्षणासाठी सक्षम होतील असा उपक्रम व प्रशिक्षण पोलीस दलाने राबवावा त्यासाठी निधी उपलब्ध करून देऊ तसेच बचत गटांच्यासाठी काम करणाऱ्या महिला समन्वयकांना रत्नागिरी जिल्ह्याच्या धर्तीवर जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून मोबाईल फोन देण्यात येतील ज्यामुळे त्यांचे ते काम कार्यक्षमपणे करू शकतील, असे ते म्हणाले.

विशेष नवदुर्गा पुरस्कार स्वीकारल्यानंतर महिला व बाल विकासमंत्री आदिती तटकरे यांनी, नवरात्रनिमित्ताने हा सन्मान केला जात असून या उत्सवातदेखील महिला पोलीस अधिकारीपासून ते गृहिणींपर्यंत सर्व महिला उत्साहाने सहभागी असतात त्यांच्या व्यस्ततेमुळे हा सन्मान सोहळा नवरात्र नंतर होत आहे. महिला पोलीस अधिकारी व कर्मचारी आपल्या मुलांना देखील पुरेसा वेळ देऊ शकत नाही, याची खंत त्यांना वाटत असेल पण त्यांच्यामुळेच समाजातील इतर सर्व मुले सुरक्षित असतात. नवदुर्गांच्या कार्याचा सन्मान हा महत्त्वाचा आहे. असे सांगून सन्मान झालेल्या विविध क्षेत्रातील महिलांच्या कार्याची माहिती देऊन मंत्री तटकरे यांनी गौरव केला.

कार्यक्रमात पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी पोलीस दलात जवळपास ३० टक्के महिला असून त्या आपली जबाबदारी सक्षमतेने पूर्ण करीत आहेत. डायल ११२च्या माध्यमातून पथकाचा जिल्ह्यातील सरासरी रिस्पॉन्स टाईम सहा मिनिट आहे. शहरी व ग्रामीण दुर्गम भागात देखील डायल ११२वर कॉल प्राप्त झाल्यानंतर पथक तातडीने पोहचते, असे त्यांनी सांगितले.

## कोकण विभाग पदवीधर मतदारसंघातील पात्र मतदारांना नोंदणी करण्याचे आवाहन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

पदवीधर मतदारसंघाच्या अनुषंगाने १ नोव्हेंबर २०२३ या अर्हता दिनांकावर आधारीत नॉव्हेंबर २०२३ या कालावधीत पदवीधर मतदार नोंदणी सुरु आहे. ज्या मतदारांनी १ जानेवारी २०२० पूर्वी पदवी प्राप्त केली आहे ते मतदार पदवीधर मतदारसंघा करीता नाव नोंदविण्यास पात्र आहेत.

पदवीधर मतदार नोंदणी ऑनलाईन पद्धतीने संकेतस्थळ https://ceoelection.maharashtra.gov.in यावर लिंकद्वारे https://ceoelection.maharashtra.gov.in/Downloads/DownloadForms/Form-18.pdf नोंदणी अर्ज उपलब्ध करून देण्यात आला आहे. जे मतदार पदवीधर मतदारसंघामध्ये मतदार नोंदणी करण्यास इच्छुक आहेत. त्यांनी नमुना नं. १८ अर्ज भरुन घ्यावे अथवा ऑनलाईन पद्धतीने नमुना नंबर १८चा अर्ज भरून आवश्यक कागदपत्रांसहीत तहसीलदार कार्यालय पनवेल येथे जमा करावेत.

नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे, या कागदपत्रांवर राजपत्रिय अधिकारी/पब्लिक नोटरी साक्षांकन असणे आवश्यक आहे. पदवीधर मतदारसंघ नावनोंदणी मोहीम कोंकण आणि मुंबई विभागासाठी नोंदणी करणारा मतदार हा ३० ऑक्टोबर २०२० पूर्वी पदवीधर झालेला असावा. त्यानंतर पदवीधर झाला असेल त्यांनी फॉर्म भरू नये. पदवी परिक्षेचा निकाल घोषित झालेला दिनांक तीन वर्षांची मुदत ठरविताना विचारात घेतला जाईल.



यासाठी पदवी किंवा पदवी समकक्ष धारण केलेली मार्कशिट किंवा पदवी प्रमाणपत्र, आधार कार्ड, इलेक्शन कार्ड, रेशन कार्ड किंवा लाईट बिल, नावात बदल असल्यास लग्न प्रमाणपत्र किंवा गॅझेट कॉपी, मतदार हा पदवीधर मतदार संघातील रहिवासी असावा, एक पासपोर्ट साइज कलर फोटो आवश्यक असून सर्व झेरॉक्सवर आपली सही करावी. सर्व पात्र पदवीधारकांनी जास्तीत जास्त प्रमाणात कोकण पदवीधर मतदार संघासाठी मतदार नोंदणी असे आवाहन पदनिर्देशित अधिकारी, कोकण पदवीधर मतदारसंघ तथा उपविभागीय अधिकारी पनवेल राहुल मुंडके यांनी केले आहे.


### जाहिरात

**रोजगार हमी योजनेअंतर्गत जिल्हा स्तरावर साधन व्यक्ती यांचे पॅनल तयार करणेसाठी जाहिरात**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत ग्राम पातळीवर केलेल्या कामाचेसामाजिक अंकेक्षण करण्यासाठी साधन व्यक्तींची नियुक्ती करण्यात येणार आहे. ही नियुक्ती महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटीच्या पॅनलवर करण्यात येणार आहे. यासाठी विहित पात्रता धारण करणारे इच्छुक उमेदवारांकडून दिनांक १६ नोव्हेंबर, २०२३ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्जाचा नमुना व सदर पदासाठी पात्रता व आवश्यक कागदपत्रे, अटी व शर्ती याचा सविस्तर तपशील जिल्हाधिकारी रायगड या कार्यालयाच्या https://raigad.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आला आहे. उमेदवारांनी त्यांचे विहित नमुन्यातील अर्ज उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय रायगड–अलिबाग या कार्यालयात दिनांक १६ नोव्हेंबर, २०२३ रोजी सायंकाळी ५.०० वाजता पर्यंत पोहोचतील अशा बेताने सादर करावेत. विहित कागदपत्रे सोबत नसलेले व अपूर्ण माहितीसह प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**सही/–**
**(भारत वाघमारे)**
**उपजिल्हाधिकारी (रोहयो) तथा**
**उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक**
**रायगड–अलिबाग**

**क्र. जिमाका /राय/जाहि./ १२९/२०२३–२४**


## रायगड जिल्ह्यातील ६१ शिक्षकांचे समायोजन

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील ६१ प्राथमिक शिक्षकांची समायोजन प्रक्रिया गुरुवारी (दि. २६) जिल्हा परिषदेच्या सुरबा नाना टिपणीस सभागृहात राबविण्यात आली. या शिक्षकांचे शून्य शिक्षकी शाळेत समायोजन करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी शिक्षकांचे समायोजन केले.

प्राथमिक शिक्षक यांच्या जिल्हांतर्गत बदली २०२२ प्रक्रियांतर्गत बदली झालेल्या टप्पा क्रमांक ६मधील कार्यमुक्त केलेल्या शिक्षकांची समायोजन प्रक्रिया राबविण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार १८ मे २०११ च्या शासन निर्णयानुसार समायोजन प्रक्रिया राबविण्यात आली आहे.

समायोजन प्रक्रिया राबविताना एकही शाळा शून्य शिक्षकी राहणार नाही याची विशेष काळजी घेत शिक्षकांचे शून्य शिक्षकी शाळेत समायोजन करण्यात आली. यापूर्वी शून्य शिक्षकी शाळांवर तात्पुरता स्वरुपात इतर शाळांमधील शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली होती.

गुरुवारी जिल्ह्यातील ६१ शिक्षकांचे समायोजन करण्यात आले. यामध्ये दोन पदोन्नती मुख्याध्यापक, दोन उर्दू मिध्यम पदवीधर, दोन उर्दू माध्यम उपशिक्षक, २१ मराठी माध्यम पदवीधर, ३४ मराठी माध्यम उपशिक्षकांचा समावेश आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी शिक्षकांचे समायोजन केले. या वेळी जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण अधिकारी पुनिता गुरव, गटशिक्षणाधिकारी उपस्थित होते.

## वाहतूक पालिसांची धडक कारवाई

**अलिबाग** : वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांवर बुधवारी (दि.२५) २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी धडक कारवाई केली.

एकूण २१५ चालकांवर कायदेशीर कारवाई करून त्यांच्याकडून एक लाख ५४ हजार रुपये इतका दंड आकारण्यात आला आहे.


### पेपर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली सामाईक मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक ज्ञानेश्वर अंबरनाथ गावंड आणि इतर यांचेकडून कायमस्वरुपी विकत घेण्याबाबतचा व्यवहार आमचे अशिल यांनी ठरविला आहे व या व्यवहाराची जाहीर नोटीस वर्तमानपत्रात देण्याबाबत विद्यमान मालक ज्ञानेश्वर अंबरनाथ गावंड आणि इतर यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

मिळकतीचे वर्णन :
मौजे पिरकोन (५५३३३९) (ULPIN २६२७७९३७८२०),
तालुका – उरण, जिल्हा – रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २२३/३/ब | १ | ०.१४.२० | १.६६ |
| | | पो.ख. ०.००.५० | |
| | | एकुण ०.१४.७० | |

या एकुण क्षेत्रापैकी विक्रेते यांच्या हिश्याचे ०.१४.७० गुंठे

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २० ऑक्टोबर २०२३

**सही**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
**बी–१०४ सफायर सी. एच. एस.**
**भूखंड क्रमांक – ३३/३४, सेक्टर २२,कामोठे,**
**तालुका पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६**
**मो. क्र. ९९२०४७५८०१**



### महाराष्ट्र शासन
**अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे.**

एम.टी.एन.एल. वागळे इस्टेट यांचे कार्यालयीन आवार, रोड नं. १६, टोयोटो शोरूम समोर, ठाणे (प.) ४००६०४.
Email ID:atc.thane-mh@gov.in दुरध्वनी क्र. ०२२–२५८२३५२८, २५८००६३७, २५८३३८२२.

(ई–निविदा)

ई–निविदा सूचना क्रं.०३/२०२३. व ०४/२०२३.

अपर आयुक्त, आदिवासी विकास ठाणे यांच्या कार्यक्षेत्रातील प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, शहापूर येथील २३, व पेण प्रकल्पातील शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना सन– २०२३–२४ मधील उर्वरित कालावधीकरिता व २०२४–२५ या शैक्षणिक वर्षात दररोज कोंबडीचे अंडे पूरवठा करणेसाठी दोन लिफाफा पध्दतीने ठोक पूरवठाधारक / वितरक यांचे कडुन ऑनलाईन ई निविदा मागवीत आहेत. ई निविदापत्र दोन लिफाफा पध्दतीनुसार (टू – बिड) स्विकारण्यात येतील.

| अ.क्र | तपशिल | अंदाजित रक्कम रुपये | निविदा फॉर्मची किंमत परत न मिळणारी | बयाण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | शहापूर प्रकल्पातील २३ शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांन करीता दररोज कोंबडीचे अंडे पूरवठा करणे | १,२७,५६,५९६/– | ५०,०००.०० (परत न मिळणारी) | ५,००,०००.०० |
| २ | पेण प्रकल्पातील १४ शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांन करीता दररोज कोंबडीचे अंडे पूरवठा करणे | ७१,७४,५३०/– | १७,०००,०० (परत न मिळणारी) | १,७०,०००.०० |

वरीलप्रमाणे दिनांक २७.१०.२०२३ रोजी https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर निविदा प्रसिध्द करण्यात येत असून मान्यता प्राप्त उत्पादक/पुरवठादार/ठोक विक्रेते इत्यादि यांचे कडून शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना सन २०२३ – २४ मधील उर्वरित कालावधीकरिता व २०२४–२५ या शैक्षणिक वर्षात दररोज कोंबडीचे अंडे पूरवठा करणेसाठी दोन लिफाफा पध्दतीनुसार (टू–बिड) ई निवीदा कार्यप्रणालीचा अवलंब करुन जाहीर ऑनलाईन निवीदा मागविण्यांत येत आहेत. सदरची निविदा दि.२७.१०.२०२३ ते दि.१३.११.२०२३ पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

**सही/–**
**(दीपक कुमार मीना, भा.प्र.से.)**
**अपर आयुक्त,**
**आदिवासी विकास, ठाणे.**


## सुपारी संघाच्या नियंत्रण मंडळ अध्यक्षपदी प्रभाकर मसाल

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड तालुका सुपारी संघाची वार्षिक उलाढाल हि २५ ते ३० कोटी रुपयांपेक्षा जास्त असून मुरुड तालुक्यातील नामवंत सहकारी संस्था म्हणून या संस्थेकडे पहिले जाते. गुरुवारी (दि. २६) नियंत्रण मंडळ अध्यक्षपदाची निवड करण्यात आली.

माजी नगरसेवक व ज्येष्ठ, अनुभवी सहकारी प्रभाकर मसाल यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. सुपारी संघाचे चेअरमन बाबा दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली नियंत्रण मंडळ अध्यक्षपदाची निवडणूक घेण्यात आली. या वेळी नथुराम महाडिक यांनी संजय गुंजाळ यांचे नाव सुचवले, तर प्रभाकर मसाल यांचे नाव अविनाश बापू भगत यांनी सुचविले. या नावास चेअरमन बाबा दांडेकर यांनी अनुमोदन दिले. गुंजाळ यांना अनुमोदन न मिळाल्याने प्रभाकर मसाल यांना अध्यक्ष म्हणून घोषित करण्यात आले. सभेस संचालक अविनाश भगत, बाळा भगत, बाळा रणदिवे, राजू गुरव, राजू पोतनीस, अमोल उपाध्ये, प्रवीण चौलकर, नरेश पाटील, हिफाजूरहेमान शेख, व्यवस्थापक जागृती चोगले, लेखनिक मृणाली कांबळे आदी उपस्थित होते.



## मतदार याद्या संक्षिप्त पुनरिक्षण सुधारित वेळापत्रक जाहीर

**अलिबाग** : छायाचित्रासह मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमाचे सुधारित वेळापत्रक जाहीर झाले आहे.

एकत्रीकृत प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करणे २७ ऑक्टोबर, दावे व हरकती स्विकारण्याचा कालावधी २७ ऑक्टोबर ते ९ डिसेंबर, मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी निश्चित केलेले ४ व ५ नोव्हेंबर व २५ व २६ नोव्हेंबर, दावे व हरकती निकालात काढणे २६ डिसेंबरपर्यंत, मतदार यादीची शुध्दता तपासणी व अंतिम प्रसिध्दीसाठी आयोगाची परवानगी मागणे व डाटाबेस अद्यावत करणे आणि पुरवणी याद्यांची छपाई १ जानेवारी २०२४पर्यंत, मतदार यादीची अंतिम प्रसिद्धी करणे ५ जानेवारी २०२४ असा आहे.


### पनवेल महानगरपालिका
**ता. पनवेल, जि. रायगड ४१० २०६**
**डे–एन.यु.एल.एम. विभाग**
**प्रधानमंत्री आत्मनिर्भर निधी योजना (PMSVANidhi)**
**जाहिर आवाहन**

पमपा/DAY-NULM/PMS४०२३/प्र.क्र.१४/१२७/२०२३ दिनांक २६/१०/२०२३

पनवेल महानगरपालिकेमार्फत PMSVANidhi प्रधानमंत्री आत्मनिर्भर निधी अंतर्गत फेरीवाल्यांना कर्ज मिळणेबाबत प्रभागनिहाय online अर्ज भरावयाचे आहेत. त्याकरीता बचतगट / संस्था / समुदाय संसाधन व्यक्ती नेमणे कामी इच्छुकांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर अर्ज हे दिनांक ०३/११/२०२३ रोजी सायं ६.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या आवक–जावक विभागात स्विकारले जातील. सदर दिनांकानंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. सदरकामी शासनाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे अर्ज भरणेचे देयक अदा करण्यात येईल.

**आवश्यक कागदपत्रे :**
१. बचतगट/संस्था नोंदणी प्रमाणपत्र
२. बचतगट/संस्थेचे/समुदाय संसाधन व्यक्तीचे पॅनकार्ड

**सही/–**
**उपायुक्त (डे–एन.यु.एल.एम.)**
**पनवेल महानगरपालिका**



### उरण नगरपरिषद
**निविदा सूचना**

उरण नगरपरिषद खाली नमूद केलेल्या कामाकरिता नोंदणीकृत अथवा अनुभवी कंत्राटदारांकडून मोहरबंद निविदा मागवित आहे. निविदा दिनांक ८/११/२०२३ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंतच्या मुदतीत मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद यांच्या नांवे दाखल करणेच्या आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (रुपये) | इसारा रक्कम | सुरक्षा अनामत | | कामाची मुदत | निविदा फॉर्म फी रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २% रोखीने | ७% रोखीने | | |
| १ | उरण नगरपरिषदेचे हद्दीतील मोरा प्राथमिक शाळा क्र. ३ मधील विद्यार्थ्यांचे वर्ग व स्वच्छतागृहाचे छताचे दुरुस्ती करणे. | रु.१,९९,३२७/– | रु.१,९९३/– | रु.३,९८७/– | रु.१३,९५३/– | २५ दिवस | रु.१०००/– |
| २ | उरण नगरपरिषदेचे हद्दीतील उरण–मोरा रोडवरील बोरी पाखाडी स.नं. १४४ मध्ये सेग्रीगेशन शेडची दुरुस्ती करणे. | रु.१,९६,८१२/– | रु.१,९६८/– | रु.३,९३६/– | रु.१३,७७७/– | २५ दिवस | रु.१०००/– |
| ३ | उरण नगरपरिषद हद्यातील भवरा हनुमाने कोळीवाडा येथील आम्रपाली इमारतीजवळ क्रॉस ड्रेनेजचे बांधकाम करणे. | रु.१,९४,१९८/– | रु.१,९४२/– | रु.३,८८४/– | रु.१३,५९४/– | २५ दिवस | रु.१०००/– |
| ४ | उरण नगरपरिषद हद्यीतील म्हातवली – उरण येथील नजीरशेठ वाडी येथील रस्त्याला पी.सी.सी. करणे. | रु.१,८३,१५०/– | रु.१,८३२/– | रु.३,६६३/– | रु.१२,८२१/– | २५ दिवस | रु.१०००/– |
| ५ | उरण नगरपरिषद हद्योतील कोटनाका – उरण येथील फ्रेन्डसर्कल मैदानाची दुरुस्ती करणे | रु.१,७४,८०१/– | रु.१,७४८/– | रु.३,४३६/– | रु.१२,२३६/– | २५ दिवस | रु.१०००/– |

सदर कामाच्या अटी/शती बांधकाम विभागातून माहितीकरिता उपलब्ध असून इच्छूक ठेकेदारांनी बांधकाम विभाग प्रमुख यांचेशी संपर्क साधावा.

**सही/–**
**(श्री.राहुल इंगळे)**
**मुख्याधिकारी,**
**उरण नगरपरिषद**


**जा.क्र.उनप/बांवि/१९१५/२०२३–२०२४**
**उरण नगरपरिषद,**
**उरण, दिनांक : २६/१०/२०२३**

# विशेष रक्तगट तपासणी मोहीम

## नवी मुंबई महापालिकेचा शालेय विद्यार्थ्यांसाठी उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

आकस्मिक प्रसंगी रक्ताची गरज भासल्यास प्रत्येकाला आपला रक्तगट माहीत असणे गरजेचे असते हे लक्षात घेत केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नवी मुंबई महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांकरिता 'विशेष रक्तगट तपासणी मोहीम' नमुंमपा आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे.




केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक माहितीसह रक्तगटाची माहिती पोर्टलमध्ये नोंदविणे आवश्यक आहे. त्यानुसार आरोग्य विभागाचे प्रमुख वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे यांच्या नियंत्रणाखाली आरोग्य विभागाने शिक्षण विभागाचे उपायुक्त दत्तात्रय घनवट यांच्या माध्यमातून शिक्षण विभागाच्या सहयोगाने २१ ते २७ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत रक्तगट तपासणी मोहीम राबविण्याचे नियोजन केले. त्यानुसार या दोन्ही विभागप्रमुखांच्या उपस्थितीत कार्यवाहीस प्रारंभ झाला आहे.ही मोहीम यशस्वीरित्या राबविण्यासाठी वाशी, ऐरोली व नेरुळ येथील सार्वजनिक रूग्णालयातील पॅथॉलॉजिस्ट व प्रत्येकी एक प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांच्या समवेत शिक्षणाधिकारी व शिक्षण विभागाचे सर्व केंद्र समन्वयक यांची २० ऑक्टोबरला बैठक घेऊन रक्तगट तपासणी मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता सूक्ष्म नियोजन करण्यात आले.

या मोहिमेंतर्गत एकूण ४४२६९ विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी करावयाची असून याकरिता सार्वजनिक रुग्णालय वाशी, ऐरोली व नेरूळ येथील पॅथॉलॉजिस्ट यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या समवेत संबंधित रुग्णालयातील प्रयोगशाळा तंत्रज्ञ व पर्यवेक्षकीय जबाबदारी करिता राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत वैद्यकीय अधिकारी यांचीदेखील नियुक्ती करण्यात आलेली आहे.

### नोडल अधिकारी करणार नियोजन

या मोहीमेच्या नियोजनामध्ये प्रत्येक नोडल अधिकारी यांना विद्यार्थी संख्या निश्चित करून देण्यात आलेली असून डॉ. शुभांगी मुनेश्वर यांच्या नियंत्रणाखील १४४५८ विद्यार्थ्यांची सार्वजनिक रुग्णालय वाशी येथे, डॉ. विश्वजीत पाटील यांच्या नियंत्रणाखाली १४२४० विद्यार्थ्यांची मॉंसाहेब मिनाताई ठाकरे रुग्णालय नेरूळ येथे तसेच डॉ. प्राजक्ता कुलकर्णी यांच्या नियंत्रणाखाली १५५७१ विद्यार्थ्यांची राजमाता जिजाऊ रुग्णालय ऐरोली येथे रक्तगट तपासणी करण्यात येत आहे.

### २० तपासणी पथके कार्यरत

नमुंमपा कार्यक्षेत्राकरिता २० तपासणी पथके कार्यरत असणार असून एका पथकामध्ये एक प्रयोगशाळा तंत्रज्ञ व एक सहाय्यक प्रयोगशाळा तंत्रज्ञ आहे. या कार्यप्रणालीत सहाय्यक तंत्रज्ञामार्फतच तपासणीसाठी रक्त घेतले जात असून प्रयोगशाळा तंत्रज्ञामार्फत रक्तगट निश्चित करण्यात येत आहे. रक्तगट तपासणीच्या पहिल्याच दिवशी ४३०३ विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी करण्यात आली.

**विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी हा एक अनोखा आणि महत्वाचा उपक्रम असून शिक्षण व आरोग्य विभागाने प्रत्येक विद्यार्थ्याची रक्तगट तपासणी करून घ्यावी. पालकांनीही महानगरपालिका शाळेत शिकणाऱ्या आपल्या मुलाच्या रक्तगटाची माहिती करून घ्यावी व नोंदवून ठेवावी.**
**–राजेश नार्वेकर, आयुक्त, नवी मुंबई मनपा**

# अतिक्रमणविरोधी पथकाची तुर्भे विभागात कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**



नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रातील तुर्भे विभाग कार्यालय अंतर्गत येणाऱ्या सेक्टर १९C, पाम बीच रोड वरील अनधिकृत गॅरेज, हॉटेल, बार, रेस्टॉरंट धारकांनी अनाधिकृतपणे समासी जागेचा व पत्राशेडचा वापर सुरू ठेवले होते.

अनधिकृत समासी जागेचा व पत्राशेडवर अतिक्रमण विभागामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते. उपरोक्त जागेवरील अनधिकृतपणे समासी जागेचा वापर व पत्राशेड हटविणेपोटी ७२,०९,८५० रुपये दंडात्मक वसुली करण्यात आली आहे. त्यानुसार ही अनधिकृत बांधकाम हटविण्यासाठी ५० मजुर, १ पोकलन, ३ जेसीबी, १ डंपर, २ गॅस कटर च्या सहाय्याने कारवाई करण्यात आली.

या धडक मोहिमेसाठी डॉ. राहुल गेठे, उप आयुक्त (अति.), बेलापूरचे सहाय्यक आयुक्त शशिकांत तांडेल, नेरुळचे सहाय्यक आयुक्त प्रबोधन मवाडे, वाशीचे सहाय्यक आयुक्त सागर मोरे, तूर्भेचे सहाय्यक आयुक्त भरत धांडे कोपरखैरणेचे सहाय्यक आयुक्त सुनील काठोले, घणसोलीचे सहाय्यक आयुक्त संजय तायडे तसेच पोलीस पथक तैनात होते. यापूढे देखील अशा प्रकारे कारवाई तीव्र करण्यात येणार आहे याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

# घणसोली येथील दोन मजली बेकायदा बांधकाम निष्कासित



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका विभाग कार्यालय घणसोली सहदेव काळूराम पाटील (घरमालक) व भोले सोनुकुमार गुप्ता (विकासक), घर नं. ०२७७७ बालाजी अपार्टमेंटलगत, शंकरबुवावाडी, घणसोली, नवी मुंबई यांनी आरसीसी तळमजला + दुसरा मजला पुर्ण व तिसऱ्या मजल्याचे बांधकाम प्रगतीपथावर होते, नवी मुंबई महापालिकेची कोणतीही पुर्व परवानगी न घेता अनधिकृतपणे सुरू केले होते. सदरील अनधिकृत बांधकामांस घणसोली विभागामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबंधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविणे आवश्यक होते. परंतू त्यांनी सदर ठिकाणी अनधिकृत बांधकाम सुरू ठेवले होते.

अनधिकृत बांधकामावर नवी मुंबई महानगरपालिका व मे. सिडको यांचेकडून तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते. त्यानुसार सदरील अनधिकृत बांधकाम कामगार व पोकलेनच्या साहाय्याने पुर्णत: निष्कासित करण्यात आलेम. या धडक मोहिमेसाठी घणसोली विभागातील अधिकारी / कर्मचारी, पोलीस पथक तैनात होते. यापूढे देखील अशा प्रकारे कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

# नवी मुंबईत १०८२ देवीमूर्तींचे विसर्जन



**नवी मुंबई : बातमीदार**

श्रीगणशोत्सवाप्रमाणेच उत्साहात संपन्न झालेल्या नवरात्रौत्सवातील विसर्जन सोहळा नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील २२ पारंपारिक विसर्जन स्थळांवर महानगरपालिकेने केलेल्या योग्य नियोजनामध्ये सुव्यवस्थित रितीने पार पडला. महापालिका क्षेत्रात ९१६ घरगुती अथवा सोसायटी देवीमूर्ती विसर्जनाप्रमाणेच १६६ सार्वजनिक देवीमूर्ती विसर्जन असे एकूण १०८२ देवीमूर्ती विसर्जन झाले.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील २२ विसर्जन स्थळांपैकी मुख्य १४ विसर्जन तलांवांमध्ये जलप्रदूषण टाळण्यासाठी गॅबीयन वॉलची रचना करण्यात आलेली असून त्याच क्षेत्रात भाविकांनी देवीमूर्ती विसर्जन करून जलाशयातील जैवविविधतेचे संरक्षण करावे अशा महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या आवाहनास श्रीगणेशोत्सवाप्रमाणेच चांगला प्रतिसाद दिला.

सर्वच २२ मुख्य विसर्जनस्थळांवर परिमंडळ १चे उपआयुक्त सोमनाथ पोटरे व परिमंडळ २ चे उपआयुक्त डॉ. श्रीराम पवार यांच्या नियंत्रणाखाली संबंधित विभाग अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त यांच्यासह विभाग कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी तसेच २०० हून अधिक स्वयंसेवक, लाईफगार्ड आणि अग्निशमन दलाचे जवान विसर्जन सोहळा सुव्यवस्थितरित्या पार पाडण्यासाठी दक्ष होते. देवींच्या सुयोग्य विसर्जनासाठी श्रीगणेशोत्सवाप्रमाणेच तराफ्यांची व्यवस्था करण्यात आली होती. पुरेशा विद्युत व्यवस्थेसह जनरेटरची पर्यायी व्यवस्था करण्यात आली होती.

सर्व २२ मुख्य विसर्जन स्थळांवर ओल्या व सुक्या निर्माल्यासाठी दोन स्वतंत्र निर्माल्य कलश ठेवण्यात आले होते. त्याची वाहतुक स्वतंत्र निर्माल्य वाहनाव्दारे करण्यात आली. या निर्माल्याचे पावित्र्य राखण्याची काळजी घेत त्यावर प्रक्रिया करण्यासाठी तुर्भे येथील प्रकल्पस्थळी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून पोलीस यंत्रणाही सर्वच ठिकाणी अत्यंत सतर्कतेने कार्यरत होती. भाविकांच्या उत्तम सहकार्यामुळे देवीमूर्ती विसर्जन सोहळा शांततेत व सुव्यस्थितीत झाला.

# सत्याग्रह महाविद्यालयात परिसंवाद

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई खारघर येथील सत्याग्रह महाविद्यालयाच्या पाली–संस्कृत आणि बुध्दिझम विभागाच्या वतीने ६७ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्ताने 'धर्मांतराची फलनिष्पती' यावर परिसंवाद अशोका विजयादशमी धम्मचक्र प्रवर्तन दिनी शांताबाई रामराव सभागृह, सत्याग्रह कॉलेज येथे झाला.

परिसंवादाचे उद्घाटन प्रो. संगिता जोगदंड यांनी केले. या परिसंवादात पंचेवीस पेक्षा जास्त अभ्यासकांनी शोध निबंध वाचले. अध्यक्ष स्थानावरुन बोलताना डॉ. जी. के. डोंगरगावकर म्हणाले, बौध्द होण्यासाठी धर्मांचे अथवा जातीचे प्रमाणपत्राची आवश्यकता नसुन बुध्दांनी जे नाकारले आणि जे स्विकारले त्याचे आचरण करणे तोच बौध्द आहे. यूनो संघटनेचे २१ व्या शतकातील १९३ पेक्षा जास्त देशाने स्विकारलेल्या १६ उद्दिष्टात बुध्द विचाराचे प्रतिबिंब आहे.

प्राचार्या नेहा राणे यानी सुत्रसंचलन केले तर सुजाता भोसले यांनी सर्वांचे स्वागत केले. प्राचार्या वनिता सुर्यवंशी यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचे सांगता झाली.






**पनवेल : देवद येथील पाटील कुटुंबीयांच्या वतीने नवरात्रोत्सावाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी सहभागी महिलांनी देवीची मनोभावे पूजा–अर्चा केली.**

# शाहू महाराज विद्यालयात वाचन स्पर्धेचा बक्षीस समारंभ

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती रबाळे शाखेतर्फे वाचन प्रेरणा दिनानिमित्त वैज्ञानिक जानिवा शिक्षण प्रकल्प स्वयं अध्ययन परीक्षा बक्षीस वितरण समारंभ गुरुवारी (दि.२६) शाहू महाराज विद्यालय रबाळे, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आला होता.



या वेळी सर्व विजेत्या १० गुणवंत विद्यार्थी यांना अंनिसच्या वतीने 'वयात येताना' हे पुस्तक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले या प्रकल्पामध्ये ५ वी ते ८ वी गटात ५० व ९ वी ते १२ वी गटात ५० असे १०० विध्यार्थी सहभागी झाले होते.

अंनिस या संघटनेच्या कार्यप्रणालीवर आधारीत प्रश्न पत्रिका विद्यार्थ्यांना सोडविण्यासाठी देण्यात आली होती विद्यार्थ्यांनी ती आई वडील भाऊ बहिण मित्र यांच्याशी चर्चा करून ती सोडऊन आणली त्याच्या बक्षीस वितरण समारंभ मुख्याध्यापक अमोल खरसंबले, जेष्ठ शिक्षिका अर्चना म्हात्रे, कल्पना नाफडे, अविनाश जाधव, अमोलकुमार वाघमारे सर यांचे हस्ते करण्यात आले

मुलांमध्ये वैज्ञानिक जाणीवा व वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी ही परीक्षा महा अंनिस च्या वतीने घेतली जाते महाराष्ट्रतील सर्व शाळांतील विद्यार्थ्यांना या परीक्षेत सहभागी करून घेऊन अंनिस संघटनेची माहीत या माध्यमातून घराघरात पोहचऊन जनजागृती करणे हा या परीक्षा घेण्या मागचा हेतू आहे असे कार्यक्रम संयोजक शाखा कार्याध्यक्ष अविनाश जाधव यांनी सांगितले.

# रसायनी ब्राह्मण सभेतर्फे दसरा कार्यक्रम

**रसायनी : प्रतिनिधी**

रसायनी ब्राह्मण सभा मोहोपाडा यांनी मंगळवारी (दि. २४) मोहोपाडा गणपतीची मंदिरात एकत्र येवून सोने लुटले. या वेळी परशुराम व सरस्वतीची प्रतीमेचे पूजन करण्यात आले व सर्वांनी एकत्रितपणे सोने लुटले.



या वेळी कोकीळ सरांनी वौचारीक सोने लुटले. कार्यक्रमाच्या सुरवातीला व शेवटी स्तवन म्हणून कार्यक्रम सादर केला. नवीन सदस्य यांचे स्वागत करण्यात आले व पुढील कार्यक्रम याची चर्चा केली अध्यक्ष बी. एस. कुलकर्णी यांच्या हस्ते सर्व ज्येष्ठ श्रेष्ठ यांना सोने देण्यात आले.

# ॲड. भार्गव पाटील राष्ट्रवादीच्या सरचिटणीसपदी



**उरण : बातमीदार**

पागोटे गावचे माजी सरपंच भार्गव दा. पाटील यांची महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी कॉंग्रेस सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

खासदार सुनील तटकरे यांच्या सुतारवाडी कार्यालयात ॲड. भार्गव पाटील यांना अधिकृत नियुक्तीपत्र देण्यात आले. या वेळी जिल्हाध्यक्ष हनुमंत पिंगळे, चिटणीस किशोर ठाकूर, उरण विधानसभा अध्यक्ष वैजनाथ ठाकूर, उरण तालुका अध्यक्ष परिक्षित ठाकूर, युवक उरण तालुका अध्यक्ष समत भोंगले, उरण शहराध्यक्ष तूषार ठाकूर, पागोटे अध्यक्ष दिनेश पाटील आदी उपस्थित होते.

# पनवेलच्या सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकपदी हनुमंत अहिरे

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलीस ठाण्यात पोलीस हवालदार म्हणून कार्यरत असणारे हनुमंत घनश्याम अहिरे यांची नुकतीच सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकपदी पदोन्नती महाराष्ट्र शासनातर्फे जाहीर करण्यात आल्याबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन पोलीस उपायुक्त परिमंडळ – २चे उपायुक्त पंकज डहाणे यांनी करंजाडे पोलीस चौकीच्या नूतनीकरण व उद्घाटनावेळी केले.

हनुमंत अहिरे यांनी आत्ता पर्यंत पोलीस खात्यात केलेल्या नोकरीमध्ये विविध क्लिष्ट गुन्ह्यांची उकल केली आहे.

दरम्यान, महाराष्ट्र शासनातर्फे त्यांना बढती मिळून सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकपदी पदोन्नती मिळाल्याने त्यांचे विशेष अभिनंदन परिमंडळ – २चे उपायुक्त पंकज डहाणे, सहाय्यक आयुक्त अशोक राजपूत, वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे, निरीक्षक अंजुम बागवान, सहाय्यक निरीक्षक कामत, खरात, उपनिरीक्षक दाभाडे, चौगुले आदींनी केले आहे.



# 'प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करा'

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

प्रदूषणकारी फटाके न फोडता अन्य उपक्रम राबवून दिवाळीचा आनंद द्विगुणीत करा, असे आवाहन अंनिसचे कार्यकर्ते अशोक निकम यांनी तुर्भे गाव येथील महापालिकेची शाळा क्रमांक १०७ मधील विद्यार्थ्यांना केले आहे.



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अशोक निकम पुढे म्हणाले की, दिवाळी म्हटले की, मुलांना सर्व प्रथम फटाके आठवतात. आनंद मिळवण्यासाठी फटाके फोडले जातात असा समज आहे. लग्न, वाढदिवस, नववर्ष, क्रिकेट साम व दिवाळीला अशा विविध प्रसंगी फटाके फोडले जातात. फटाके फोडण्याचा उद्देश आनंद मिळवणे हा आहे, मग तो मिळतो का? तर नाही. कारण फटाके कारखान्यात लहान मुलांकडून बनवून घेतले जातात. फटाके फोडणे म्हणजे बालमजुरीला प्रोत्साहन देणे होय.

फटाक्यांच्या धुरामुळे वायू प्रदूषण होते. दमा, खोकला, डोळ्यांची जळजळ, डोकेदुखी असे आजार उद्भवतात. फटाके फोडताना अपघात होतात.

फटाके न फोडताही दिवाळीचा आनंद मिळवता येतो. आपल्या कल्पनांना वाव देत सुंदर रांगोळी काढून दिवाळीची शोभा वाढवता येते. आकर्षक आकाश कंदील स्वतःच्या हाताने बनवून दिवाळीचा आनंद द्विगुणीत करता येतो. स्वहस्ते शुभेच्छा पत्र बनवून आपल्या मित्रमैत्रिणींना देऊन मैत्री जपता येते. दिवाळीत विविध मासिकांचे व साप्ताहिकांचे विशेष दिवाळी अंक प्रकाशित होतात. ते अंक विकत घेऊन आपला वाचनाचा छंद जोपासता येतो.

फटाके न फोडताही दिवाळी साजरी करण्याचे अनेक पर्याय असतात, फक्त आपली इच्छाशक्ती असली पाहिजे, असे निकम यांनी सांगितले.

## निवडक

### रोह्यात जेएसएसतर्फे कौशल्य स्पर्धा



**रोहा** : जन शिक्षण संस्थान रायगड व एक्सल इंडस्ट्रीजचे श्री. विवेकानंद प्रशिक्षण व संशोधन केंद्राच्या माध्यमातून गुरुवारी (दि. २६) रोहा येथे मेकअप स्पर्धा घेण्यात आली, तसेच प्रशिक्षणार्थींना सहाय्यक कार्यक्रम अधिकारी वेदांती पाटील यांनी स्वच्छतेची शपथही दिली. कार्यक्रमाच्या वेळी सार्वजनिक स्वच्छतेतून आरोग्य संरक्षण असा संदेश एक्सल इंडस्ट्रीजचे सीएसआर प्रमुख सुशील रुळेकर यांनी व्यक्त केले. संस्थापक अध्यक्ष डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्ष गीतांजली ओक, संचालक डॉ. विजय कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम घेण्यात आले. या वेळी ॲड. दिप्ती सावंत, पर्यावरण विभाग प्रमुख आश्विनी फुलारे, महिला सक्षमिकरण हर्षदा दगडे, प्रशिक्षिका अक्षता जामकर, अनिता घोसाळकर उपस्थित होते.

### मुरूडमध्ये रविवारी रक्तदान शिबिर

**मुरूड** : अलिबाग-मुरूड मेडिकल असोसिएशन, जंजिरा मेडिकल असोसिएशन व जय श्रीराम नागरी सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने ब्लड बँक, सिव्हिल हॉस्पिटल यांच्या सौजन्याने कै. कृष्णा गीदी यांच्या स्मृर्तीप्रित्यर्थ रविवारी (दि.२९) कल्याणी हॉस्पिटल येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी रक्तदान करून या सत्कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन मेडिकल असोशिएनतर्फे करण्यात आले आहे.

# रायगडच्या विकासासाठी कटिबद्ध -ना. उदय सामंत

## रोह्याच्या कडसुरे येथे शुद्ध पाणीपुरवठा योजनेचा शुभारंभ

**नागोठणे : बातमीदार**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून हर घर नल ही संकल्पना संपूर्ण देशात राबविली जात आहे. रायगड जिल्ह्यात या योजनेसाठी १,२३६ कोटी रुपये निधी उपलब्ध झाल्यामुळे आता जिल्ह्यातील गावागावात मुबलक पाणी उपलब्ध होणार आहे. माझ्या सूचनांचा रिलायन्स व्यवस्थापनाने आदर केल्यामुळे सीएसआर फंडातून कडसुरे गावाला शुद्ध पाणीपुरवठा उपलब्ध झाल्या असल्यामुळे गावातील महिलांची पायपीट थांबली असल्याचे मला समाधान आहे. रायगड जिल्ह्याचा क्रांतीविकास झाल्याशिवाय मी शांत बसणार नाही, असे प्रतिपादन उद्योगमंत्री व पालकमंत्री उदय सामंत यांनी नागोठणेजवळील कडसुरे येथे केले.





नागोठणे येथील रिलायन्स कंपनीने सीएसआर फंडातून २० लाख रुपये खर्च करून कडसुरे गावाकरिता शुद्ध पाणीपुरवठा योजनेचा शुभारंभ बुधवारी (दि.२५) सायंकाळी ना. उदय सामंत यांच्या हस्ते करण्यात आले त्यावेळी उपस्थित ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना सामंत बोलत होते.

या वेळी अभिनेत्री निलम शिर्के, कामगार नेते दिपक रानवडे, रोहा तालुकरप्रमुख ॲड. मनोज शिंदे, रिलायन्स नागोठणे युनिटचे उपाध्यक्ष गौतम मुखर्जी, वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी रमेश धनावडे, सीएसआर विभागाच्या वरदा कुलकर्णी, पोलीस उपविभागीय अधिकारी सोनाली कदम, सपोनि संदिप पोमन, उपजिल्हा प्रमुख उद्धव कुथे, किशोर म्हात्रे, एकनाथ ठाकूर, विष्णू लोखंडे, सामाजिक कार्यकर्ते विकासभाऊ शिर्के, अरुण शिर्के, कडसुरे उपसरपंच रविंद्र शिर्के, पांडुरंग शिंदे, दत्तात्रेय शिर्के, दिलीप महाराज शिंदे, महेश शिंदे, भानुदास शिंदे, संदीप शिंदे, समाधान शिंदे, काशिराम गव्हंडकर, धनंजय महाडिक व अनिल शिंदे, रघुनाथ शिर्के, यशवंत शिर्के, किशोर शिर्के, संजय शिर्के, प्रकाश मोरे, प्रमोद मोरे, मनोज खांडेकर, मंगेश रावकर, निलम कुथे, वर्षा सहस्त्रबुद्धे, अमृता धनावडे आदींसह कार्यकर्ते व ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुंडलिक ताडकर, प्रास्ताविक माजी सरपंच दत्तात्रेय शिर्के व आभार प्रदर्शन सामाजिक कार्यकर्ते विकास शिर्के यांनी केले. दरम्यान शुद्ध पाण्यासाठी गावातील महिलांची पायपीट थांबावी यासाठी पांडुरंग शिंदे, दिलीप महाराज शिंदे, दत्तात्रय शिर्के, महेश शिंदे, भानुदास शिंदे, संदीप शिंदे, समाधान शिंदे, काशिराम गव्हंडकर, धनंजय महाडिक व अनिल शिंदे आदी ग्रामस्थांनी विशेष मेहनत घेतली.

या वेळी ना. उदय सामंत यांच्या कार्यप्रणालीवर खूष होऊन गावातील क्रियाशील कार्यकर्ते संजय शिर्के, रघुनाथ शिर्के, यशवंत शिर्के, रुपेश शिर्के, अरविंद शिर्के, रोहिदास शिर्के, प्रमोद शिर्के, अविष्कार शिर्के, सर्वेश शिर्के आदींसह गावातील प्रमुख ५० कार्यकर्त्यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

सर्व प्रवेशकर्त्यांचे ना. उदय सामंत यांनी स्वागत करून पक्षात आपणास मानसन्मानाची वागणूक दिली जाईल व आपल्या अडचणी सोडविण्यासाठी मी कटीबद्ध असल्याची ग्वाही ना. उदय सामंत यांनी दिली.

## खालापुरात सरपंचपदासाठी ६०, सदस्यपदासाठी ३५९ उमेदवार रिंगणात

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील ग्रामपंचायत निवडणुकीसाठी रणधुमाळी जोरदार सुरू झाली असून २२ सरपंचपदासाठी ६० उमेदवार रिंगणात उतरले आहेत, तर १५३ सदस्यपदासाठी ३५९ उमेदवार आपले नशीब अजमावत आहेत. त्याचप्रमाणे ४९ सदस्य बिनविरोध निवडून आले आहेत.

खालापूर तालुक्यातील ग्रामपंचायत निवडणुकीसाठी सादर करण्यात आलेल्या निवडणूक नामनिर्देशन पत्राची छाननी झाल्यानंतर उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा बुधवारचा दिवस होता. अर्ज मागे घेण्याची मुदत दुपारी तीन वाजता संपल्यानंतर चिन्हांचे वाटप करण्यात आले. सरपंचपदासाठी गॅस सिलेंडर, कपबशी, रिक्षा आणि छताचा पंखा याला जास्त मागणी होती, नामनिर्देशन पत्र प्रथम सादर करणाऱ्या उमेदवारांना पहिली पसंती देण्यात आली होती.




ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी आणि ग्रुप ग्रामपंचायत माणकिवली येथे पंचरंगी लढत होत असून तांबाटी ग्रामपंचायतीकडे तालुक्याचे लक्ष लागून राहिले आहे. अनेक पक्षांचे कार्यकर्ते असलेल्या चांभार्ली ग्रामपंचायतीची चौरंगी लढत होत आहे. तालुक्यात आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या होनाड, आत्करगाव, सावरोली, नारंगी, ईसांबे, जांभिवलीतर्फे छत्तिषी, जांबरुंग, बीड खुर्द या आठ ग्रामपंचायतमध्ये तिरंगी लढत होत आहे.

ठाणेन्हावे, कुंभिवली, नंदनपाडा, शिरवलीतर्फे छत्तीशी, खाणाव, चिलठण, वासांबे, माजगाव, वावर्ले, बोरगाव, वरोसे तर्फे वनखळ या ११ ठिकाणी दुरंगी लढत आहे. २२ सरपंच पदासाठी ६० उमेदवार,१५३ सदस्य पदासाठी ३५९ जण आपले नशीब अजमावत आहेत, तर ४९ सदस्यांचा ग्रामपंचायतींसाठी सुखकर प्रवेश झाला आहे.

ग्रुप ग्रामपंचायत नंदनपाडा, ग्रुप ग्रामपंचायत बोरगाव व ग्रुप ग्रामपंचायत वरोसे तर्फे वणखळ येथे गा सौजन्याने प्रत्येकी एक प्रभाग बिनविरोध झाला असून तालुक्यात ६७ प्रभागात निवडणूक होत आहे.

खालापूर तालुक्यातील २२ ग्रामपंचायतीपैकी सात ग्रामपंचायत उरण विधानसभा मतदारसंघात येत असून भारतीय जनता पक्षाचे विद्यमान आमदार महेश बालदी येथे कार्यरत असून १५ ग्रामपंचायत कर्जत खालापूर विधानसभा मतदारसंघात येत असून येथे शिवसेनेचे आमदार महेंद्र थोरवे आहेत.

वासांबे, सावरोली, तांबाटी, होनाड, आत्करगाव, कुंभीवली, ईसांबे, नारंगी, जांभीवली, शिरवली, माजगाव या ग्रामपंचायती औद्योगिक क्षेत्रात येत असून आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या ग्रामपंचायती असल्याने प्रत्येक जण आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत आहे.

## खोपोली-खालापुरात भावपूर्ण वातावरणात देवींचे विसर्जन

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोलीत नवरात्रोत्सवाची सांगता बुधवारी झाली. आकर्षक मिरवणुका काढून भक्तीपूर्ण वातावरणात देवी व घटाचे विसर्जन करण्यात आले.

देवीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना, आकर्षक मंडपासह तेवढ्याच आकर्षक विद्युत रोषणाईची झगमगाट व सोबत दमदार साऊंड सिस्टीमने आपला नवरात्रोत्सव इतरांपेक्षा अधिक बहारदार करण्यासाठी खालापूर व खोपोलीतील सर्व मंडळांच्या पदाधिकारींची तयारी केली होती. विजयादशमीपर्यंत १० दिवस देवीची आराधना, संगीताच्या ठेक्यावर चालणारा दांडिया रास व त्याच्या जोडीला विविध सांस्कृतिक कार्यक्रम झाले. काही मंडळांनी मंगळवारी तर बहुसंख्य मंडळानी देवी व घटाचे विसर्जन दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशी बुधवारी केले. संगीताच्या ठेक्यावर मिरवणुका काढून विरेश्वर मंदिर तळ्यात देवीचे विसर्जन झाले. या वेळी खोपोली पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

## श्री जोगेश्वरी मातेचा आशीर्वाद घेऊन परिवर्तन पॅनलचा नागोठण्यात प्रचार



**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे ग्रामपंचायत निवडणूक येत्या ५ नोव्हेंबर रोजी होत असून या निवडणुकीतील परिवर्तन पॅनलचे (राष्ट्रवादी, भाजप, शिवसेना) सरपंचपदाचे उमेदवार मनिषा बाळासाहेब टके, प्रभाग क्र. ५ चे उमेदवार श्रेया केदार कुंटे, शितल संजय नांगरे, किरण चंद्रकांत गायकवाड व प्रभाग क्र. १चे उमेदवार ॲड. रमण जाधव यांनी गुरुवार (दि. २६) रोजी सकाळी १० वाजता नागोठणे ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता मंदिरात नेतेगण व कार्यकर्ते यांच्या समवेत श्री जोगेश्वरी माता व श्री भैरवनाथ महाराज यांचे दर्शन घेऊन आपल्या प्रचाराचा शुभारंभ केला.

नागोठणे गावात परिवर्तन घडवून आणण्यासाठी व गावाच्या विकासासाठी आम्हाला निवडून द्या, असे साकडे घातले. दरम्यान श्री जोगेश्वरी माते की जय भैरवनाथ महाराज की, जय परिवर्तन पॅनलचा विजय असो, अशा घोषणांनी संपूर्ण मंदिर परिसर दणादून गेला होता.

या वेळी बाळासाहेब टके, चंद्रकांत गायकवाड, राजेश पिंपळे, आनंद लाड, सिराज पानसरे, अशोक अहिरे, सुभाष पाटील, केदार कुंटे, शेखर गोळे, बिपीन सोष्टे, तिरत पोलसानी, मामा पेंढारकर, दीपाली टके, सुवर्णा टके, नंदा गायकवाड, प्रियांका पिंपळे, मुग्धा गडकरी, सोनी पांडे आदींसह परिवर्तन पॅनलचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## माणगाव पंचायत समितीतर्फे अमृत कलश यात्रा दिल्लीला रवाना

**माणगाव : प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवनिमित्त माणगाव पंचायत समितीतर्फे माझी माती माझा देश अंतर्गत अमृत कलश शोभायात्रा काढण्यात आली होती. ही अमृत कलश यात्रा माणगाव पंचायत समितीतर्फे गुरुवारी (दि. २६) सकाळी पंचायत समिती माणगाव येथून दिल्लीला रवाना करण्यात आली.

माणगाव पंचायत समितीचा अमृत कलश गटविकास अधिकारी संदिप जठार यांनी सहाय्यक गटविकास अधिकास अधिकारी तथा जिल्हा समन्वयक महेंद्र गायकवाड व स्वयंसेवक पराग पालपिणकर यांच्याकडे सुपुर्द केला.

या वेळी कृषी अधिकारी बाळकृष्ण काप, विस्तार अधिकारी कृषी अशोक मार्कड, विस्तार अधिकारी अरोग्य आंबरे, माझी वसुंधरा तज्ज्ञ कोकण विभाग अमोल पडळकर व युवराज सरडे, सतिश शेडगे यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.



## महाडमधील १८पैकी १५ ग्रामपंचायतींवर शिवसेनेचा दावा

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यासह विधानसभा मतदारसंघात होऊ घातलेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत बिनविरोध झालेल्या १८पैकी १५ ग्रामपंचायतींवर शिवसेनेचा झेंडा फडकल्याची माहिती आमदार भरत गोगावले यांनी गुरुवारी (दि. २६) पत्रकार परिषदेत दिली.



महाड विधानसभेतील महाड, पोलादपूर व माणगाव या तालुक्यात एकूण ६० ग्रामपंचायत निवडणूक होत असून दरम्यान यापैकी १८ ग्रामपंचायत बिनविरोध झाल्या असून या १८ ग्रामचायतींचे सरपंच आमदार भरत गोगावले यांच्यासह पत्रकार परिषदेत हजर होते. या ग्रामपंचायतीवर आपण निर्विवाद वर्चस्व मिळविले असून उर्वरित ४२ ग्रामपंचायत महायुतीच्या माध्यमातून पूर्ण ताकदीने लढवत असून, ६०पैकी ५२ ग्रामपंचायत आपण विजयी होणार असा दावा गोगावले यांनी या वेळी केला आहे.


या पैकी राजेवाडी ही मुस्लिम बहुल ग्रामपंचायत आज ७० वर्षांनी शिवसेनेकडे आल्याने शिवसैनिकांचा आनंद द्विगुणित झाला आहे. विकासकामांच्या जोरावरच आपण या ग्रामपंचायतीवर विजय मिळवू शकलो असल्याचे गोगावले यांनी सांगितले.

ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर सध्या तालुक्यात राजकीय रणधुमाळी सुरू आहे. प्रत्येक जण आपले वर्चस्व कायम ठेवण्यासाठी प्रयत्नशिल आहे.

# श्री धावीर महाराज पालखी सोहळयाची दुसऱ्या दिवशी सांगता

**धाटाव . प्रतिनिधी**

रोहयाचे ग्रामदैवत श्री धाविर महाराजांची बुधवारी पहाटे सुरू झालेल्या पालखी सोहळयाची सांगता दुसऱ्या दिवशी गुरूवारी (दि. २६) दुपारनंतर झाली. शहरात फिरून रोहेकरांना दर्शन देत आणि गावामध्ये बंधुभेटी करीत ३० तासांनंतर देव मंदिरात परतले.



या वेळी पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर व पथकाने श्री धाविर महाराजांना पुन्हा सशस्त्र मानवंदना दिली.

महाआरती आणि सेवेकऱ्यांचे मानपान कार्यक्रमानंतर पालखी उत्सवाची सांगता झाली. परंपरेनुसार मंदिर ट्रस्ट आणि उत्सव समितीकडून रायगड पोलीस, महसूल विभाग, रोहा नगर पालिका, महावितरण विभाग, उत्सवाचे मानकरी आदींसह ३० तास पालखीउत्सवात अखंडपणे विविध प्रकारे सेवा देणाऱ्या सेवेकऱ्यांना प्रसादाचे नारळ भेट देत त्यांचे सन्मान करण्यात आले.

या वेळी पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर, ट्रस्टचे अध्यक्ष प्रशांत देशमुख, कार्यवाह मकरंद बारटक्के, उत्सव समितीचे अध्यक्ष मयुर पायगुडे, विश्वस्त नितीन परब, माजी नगराध्यक्ष लालताप्रसाद कुशवाह, महेश सरदार, मोतीशेठ जैन, महेश कोलाटकर उत्सव समितीचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.

### सेवेकरी तरुणांची अनवाणी ३० तास पालखी सेवा

*या पालखी सोहळ्यात उत्सव समितीतील काही पदाधिकारी, गावातील तरुण सेवेकरी आणि धाविर भक्तांनी ३० तास पालखी समवेत अनवाणी पायाने आपली सेवा रुजू केली, पालखीसाठी विविध सेवा देणाऱ्यांसह मोठ्या संख्येने तरुण यामध्ये सहभागी झाले होते. दोन दिवस कडक उन्हात कशाची तमा न करता ही मंडळी पालखी समवेत सेवा देत होती, काहींच्या पायांना छोट्यामोठ्या जखमाही झाल्या. परंतु या तरुणांनी धावीर महाराजांचा जयघोष करीत पालखी दरम्यान आपली अखंडित आणि अविश्रांत सेवा केली.*


जवळपास ३० तास चाललेल्या या पालखी सोहळ्यासाठी ट्रस्टचे प्रमुख पदाधिकाऱ्यांसह उत्सव समितीचे अध्यक्ष मयुर पायगुडे, कार्यवाह भूपेंद्र धाटावकर, उपाध्यक्ष नितेश जाधव, सहकार्यवाह दर्शन कदम, सहकार्यवाह निखिल अमृसकर, खजिनदार सुरज राऊत, सहखजिनदार विनोद पवार आदींसह सर्व पदाधिकाऱ्यांनी या पालखी सोहळ्यात अविश्रांत परिश्रम घेतले.


## कोजागरीनिमित्त 'मैफिल'तर्फे उद्या अलिबागेत रंग-ए-गझल

**अलिबाग : प्रतिनिधी**

मैफिल अलिबाग आणि लायन्स क्लब अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने कोजागरी पौर्णिमेच्या दिवशी शनिवारी (दि. २८) संध्याकाळी ७ वाजता आरसीएफ, कुरुळ वसाहतीमध्ये विख्यात गायक रमाकांत गायकवाड आणि सुप्रसिद्ध गायिका सन्मीता धापटे-शिंदे यांचा हिंदी-मराठी गझल गायनाचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

मैफिल संस्थेने दरवर्षी कोजागरी पौर्णिमेच्या दरम्यान वैविध्यपूर्ण कार्यक्रमाच्या आयोजनाची परंपरा याही वर्षी कायम ठेवत गायक रमाकांत गायकवाड आणि सूर नवा ध्यास नवा या कार्यक्रमाच्या चौथ्या पर्वाची विजेती गायिका सन्मीता धापटे-शिंदे यांचा हिंदी-मराठी गझल गायनाचा विशेष कार्यक्रम लायन्स क्लब अलिबागच्या सहयोगाने आयोजित केला आहे. मूळचे मराठवाड्यातले रमाकांत गायकवाड यांना किराणा घराण्याचे डॉ. सतीश कौशिक, उस्ताद बडे गुलाम अली खाँ यांचे शिष्य पद्मश्री पं. जगदीश प्रसाद तसेच पं. नयन घोष अशा दिग्गजांकडून संगीतातील विविध पैलू शिकण्याचे सौभाग्य प्राप्त झाले. आश्वासक युवा कलाकार म्हणून अनेक प्रतिष्ठेचे पुरस्कार, शिष्यवृत्ती व फेलोशिप त्यांच्या गाठीशी आहेत. मैफिलीची दुसरी कलाकार सन्मीता धापटे-शिंदे या संगीतामध्ये सुवर्णपदकासह एमए आहेत. पं. सुर्यकांत गायकवाड व डॉ. सलील कुलकर्णी यांचेकडे संगीताचे शिक्षण घेतलेल्या सन्मीता यांनी सूर नाव ध्यास नवा या लोकप्रिय कार्यक्रमाच्या चौथ्या पर्वात प्रथम क्रमांक पटकावला होता. त्यांना





गजल व सुगम संगीतातील उत्तम कामगिरीबद्दल भारत सरकारची विशेष शिष्यवृत्ती त्यांनी मिळवलेली आहे.या कार्यक्रमात तबल्यावर कौस्तुभ तळेकर, हार्मोनियमवर ओंकार सोनवणे, कि-बोर्डवर शिवहरी रानडे तर बासरीवर सतेज करंदीकर हे गुणी युवा कलाकार साथ संगत करणार आहेत. कार्यक्रमाचे निवेदन सुप्रसिद्ध निवेदक सचिन-सुरेश हे करतील. अधिक माहितीसाठी कार्यक्रम समन्वयक उदय जोशी (९९२१९२४५००) यांच्याशी संपर्क साधावा.

# बाबर आझमचे कर्णधारपद धोक्यात!

## अफगाणिस्तानविरुद्धच्या पराभवानंतर पीसीबी घेणार कठोर निर्णय

**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**

एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेनंतर बाबर आझमकडून पाकिस्तानचे कर्णधारपद काढून घेतले जाऊ शकते. त्याच्या जागी कर्णधारपदाची जबाबदारी घेण्यासाठी तीन नावे चर्चेत आहेत. त्याचा सहकारी मोहम्मद रिझवान या शर्यतीत आघाडीवर आहे. त्याचबरोबर शाहीन आफ्रिदी आणि माजी कर्णधार सरफराज अहमद यालादेखील पाकिस्तान संघाचे कर्णधारपद मिळू शकते.



वर्ल्डकपनंतर लगेचच पाकिस्तानला ऑस्ट्रेलियाचा दौरा करायचा आहे. २०२४ टी-२० विश्वचषक आणि २०२५ आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीसाठीही संघाला नियोजन करण्याची गरज आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डामध्ये स्पष्ट एकमत आहे की बाबरला स्वतःला सिद्ध करण्याची संधी होती आणि तो कर्णधार म्हणून चांगली कामगिरी करण्यात अपयशी ठरला आहे. वर्ल्ड कपमध्ये पाकिस्तानचे आणखी चार साखळी सामने बाकी आहेत, जर त्यांनी ते चारही सामने जिंकले तर ते उपांत्य फेरीसाठी पात्र ठरू शकतात.

एका पाकिस्तानी जिओ टीव्ही वृत्तवाहिनीने सांगितले की, पाकिस्तानने एखादा चमत्कार घडवून आणला, तरच ते या विश्वचषकातील त्यांचे उर्वरित सर्व सामने जिंकतील आणि उपांत्य फेरीत पोहचतील. बाबरला कर्णधार म्हणून पुढे जाण्याची ही कदाचित ही शेवटची संधी असू शकते. तरीही त्यांच्याकडून कसोटी संघाचे कर्णधारपद हिरावून घेतले जाऊ शकते.

सूत्रांनी सांगितले की, बाबरच्या विरोधात तयारी करण्यात आली आहे आणि जर संघ विश्वचषक उपांत्य फेरीत न खेळता मायदेशी परतला तर तो कर्णधारपदाचा राजीनामादेखील देऊ शकतो. त्याला कर्णधार म्हणून बेलगाम हक्क आणि अधिकार देण्यात आले आहेत तसेच पाकिस्तान संघात त्याच्या आवडीचे खेळाडू आहेत. त्यामुळेच विश्वचषकातील पराभवासाठी पूर्णपणे त्याला जबाबदार धरले जात आहे.

विशेष म्हणजे सरफराज, शाहीन, रिझवान आणि शान मसूद यांच्यासह संभाव्य उमेदवारांच्या लॉबीने कर्णधारपदी आपला उमेदवार निवडून आणण्यासाठी कामाला सुरुवात केली आहे. बोर्ड आता कसोटी, एकदिवसीय आणि टी-२० क्रिकेटसाठी स्वतंत्र कर्णधार ठेवण्याची योजना आखत आहे. सरफराजला पुन्हा कसोटी आणि एकदिवसीय संघांचे कर्णधारपद मिळू शकते, तर शाहीनला टी-२०चे कर्णधार बनण्याची संधी मिळू शकते.

### सपोर्ट स्टाफवरही येणार गंडांतर

मिकी आर्थर, ग्रँट ब्रॅडबर्न, मोर्ने मर्क्ले, अँड्र्यू पुटिक आणि व्यवस्थापक रेहान उल हक यांच्या सपोर्ट स्टाफचीही चौकशी सुरू असून त्यांना विश्वचषकानंतर पद सोडण्यास सांगितले जाईल. ऑस्ट्रेलियाच्या कसोटी दौऱ्यानंतर आणि विश्वचषक स्पर्धे नंतर न्यूझीलंडमधील पांढऱ्या चेंडूंच्या मालिकेसाठी पाकिस्तानकडे नवीन प्रशिक्षक कर्मचारी आणि कर्णधार असण्याची शक्यता आहे, असेही पाकिस्तान बोर्डाच्या सूत्राने स्पष्ट केले.

# अलिबागेत आजपासून राज्य मानांकन कॅरम स्पर्धा



**अलिबाग : प्रतिनिधी**

कमळ नागरी सहकारी पतसंस्थेतर्फे २७ ते २९ ऑक्टोबर या कालावधीत राज्य मानांकन कॅरम स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धा पुरुष व महिला एकेरी पद्धतीने खेळली जाणार आहे. पुरुष गटात पुण्याच्या अभिजित त्रिपणकर, तर महिला गटात मुंबईच्या काजल कुमारी यांना अग्र मानांकन देण्यात आले आहे.

कमळ नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन सतीशचंद्र पाटील यांनी गुरुवारी (दि. २६) पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. महाराष्ट्र कॅरम असोसिएशनचे उपाध्यक्ष तथा रायगड जिल्हा कॅरम असोसिएशनचे अध्यक्ष गिरीश तुळपुळे या वेळी उपस्थित होते.

अलिबाग कुरूळ क्षात्रेक्य समाज हॉलमध्ये स्पर्धा खेळवली जाणार आहे. महाराष्ट्र कॅरम असोसिएशन व रायगड जिल्हा कॅरम असोसिएशनने या स्पर्धेला मान्यता दिली आहे. २७ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात येणार आहे.

स्पर्धेत महाराष्ट्रातील पुरुष व महिला एकूण २४० खेळाडू सहभागी होणार आहेत. स्पर्धेत आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय खेळाडूंचा खेळ पाहण्याची संधी क्रीडा शौकिनांना मिळणार आहे. स्पर्धेतील विजेत्यांना कमळ नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने एक लाख १० हजारांची रोख पारितोषिके व चषक देण्यात येणार आहे. सर्व खेळाडूंची निवास व भोजन व्यवस्था कमळ पतसंस्थेकडून केली जाणार आहे. या स्पर्धेतील महत्त्वांच्या सामन्यांचे थेट प्रक्षेपण महाराष्ट्र कॅरम असोसिएशनच्या युट्युब चॅनलवरून करण्यात येणार आहे. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विविध समित्या बनविण्यात आल्या आहेत. स्पर्धेची तयारी पूर्ण झाली आहे, अशी माहिती सतीशचंद्र पाटील यांनी दिली.

आंतरराष्ट्रीय पंच परविंदर सिंग यांची प्रमुख पंच म्हणून, तर आंतरराष्ट्रीय पंच आशिष बागकर यांची सहाय्यक प्रमुख पंच म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तांत्रिक संचालकपदी आंतरराष्ट्रीय पंच अजित सावंत यांची नियुक्ती महाराष्ट्र कॅरम असोसिएशनने केली आहे, असे महाराष्ट्र कॅरम असोसिएशनचे उपाध्यक्ष व रायगड डिस्ट्रिक्ट कॅरम असोसिएशनचे अध्यक्ष गिरीश तुळपुळे यांनी सांगितले.

# मार्शल आर्ट स्पर्धेत संजीवनी हायस्कूल अव्वल



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

कोपरखैरणे सेक्टर ११मधील नवी मुंबई महापालिका शाळा क्र. ९४ येथे नवी मुंबई जिल्हा क्रीडा परिषद व सिकई मार्शल आर्ट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय शालेय सिकई आर्ट क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत नेरूळमधील संजीवन हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी १७ सुवर्ण, ११ रौप्य व दोन कांस्यपदके जिंकून बाजी मारली.

दिव्या पाल, नाझीया पटेल, प्रेरणा कांबळे, तमन्ना रावल, वैष्णवी मोरबेकर, प्रणय लोखंडे, रोहित खडका, सनी पाथरे, नितेश भूल, यशपाल तिडके, मंथन पवार, अंशुल नेगी, प्रशांत नेटके, सुमित निकम, प्रिन्स रावल, निशा गुप्ता, तनिष्का भगत यांनी सुवर्ण; दिपीका पट्टेबहादूर, मानसी फडके, तन्वी परांजपे, योगेश मौर्या, युवराज लाड, रोहित नेटके, सनी पाथरे, रोहित खडका, राज ढारकार, खुशी कुमारी यांनी रौप्य आणि नाझिया पटेल, देव पाथरे यांनी कांस्यपदक जिंकले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे नवी मुंबई क्रीडा अधिकारी देवप्पा गुरव व महापालिका शाळा क्र. ९४च्या मुख्याध्यापिका अमृता यांनी अभिनंदन केले तसेच विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. क्रीडा मार्गदर्शक सुधाकर, क्रीडा शिक्षिका सुरेखा जगदाळे, मुख्याध्यापक विलास चौधरी, व्यवस्थापक निवास शेवाळे यांचे संस्थेचे अध्यक्ष अशोक गावडे, सदस्य सपना गावडे व मनाली भगत यांनीही कौतुक केले.

# गोवा येथे ३७व्या नॅशनल गेम्सला शानदार सुरुवात

**नागोठणे : बातमीदार**

३७व्या नॅशनल गेम्सला गोव्यातील पणजी कॅम्पल ग्राउंड विलेज येथे सुरुवात झाली आहे. केंद्र व राज्य सरकार तसेच इंडियन ऑलिम्पिक असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या खेळांमध्ये एकूण २८ राज्यातील ३०४ खेळाडूंची निवड झाली आहे. यंदा यामध्ये पिंच्याक सिलॅट हा खेळ प्रथमच समाविष्ट झाला आहे.

या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील तब्बल २० खेळाडूंची निवड झालेली असून ते एकूण २३ पदकांसाठी खेळणार आहेत. संघाचे व्यवस्थापक म्हणून साहेबराव ओहोळ आणि प्रशिक्षक म्हणून सुहास पाटील व अभिषेक आव्हाड यांची निवड करण्यात आली. राज्यातील खेळाडूंचे प्रशिक्षण शिबिर महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या सहकार्याने आंतरराष्ट्रीय खेळाडू व प्रशिक्षक किशोर येवले यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबईत झाले.

# जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेत कर्जतची गुडशेफर्ड शाळा विजेती

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

राज्य शासनाच्या क्रीडा विभागातर्फे रायगड जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धा लोधिवली येथील रिलायन्स मैदानात झाली. यात कर्जत येथील गुडशेफर्ड शाळेने अंतिम सामन्यात खोपोलीच्या जनता शाळेचा पराभव करीत विजेतेपदक पटकाविले. कर्जतच्या संघाकडून वेदांत लक्ष्मण ढेबे याने नेत्रदीपक फलंदाजी केली.



वेदांत ढेबेची दमदार फलंदाजी

कर्जतच्या संघाने पहिल्या सामन्यात यजमान अंबानी स्कूल लोधिवली यांचा, दुसऱ्या सामन्यात जी. के. म्हात्रे वाशी, तिसऱ्या सामन्यात डी. डी. विसपुते पनवेल आणि चौथ्या सामन्यात सेंट मेरी स्कूल उरणचा पराभव केला. यानंतर अंतिम सामन्यात जनता विद्यालय खोपोली संघाला मात देत विजेतेपदावर मोहर उमटवली

या यशाबद्दल गुडशेफर्ड शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर अमला यांनी सर्व खेळाडूंचे कौतुक केले. आता गुडशेफर्ड शाळा कोकण विभागीय क्रिकेट स्पर्धेत रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करेल. रायगडसोबत मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे पालघर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील विजेते संघ विभागीय स्पर्धेत समाविष्ट असतील.

# श्रीलंकेचा इंग्लंडवर दणदणीत विजय

**बंगळुरू** : गतविजेत्या इंग्लिश संघासाठी विश्वचषक २०२३ खूपच वाईट ठरला आहे. इंग्लंड संघाने आतापर्यंत तीन सामने खेळले. त्यातील दुसरा सामना सोडला, तर इंग्लंडने उर्वरित तीन सामन्यांत पराभव पत्करला आहे. अशात त्यांना श्रीलंकेविरुद्धच्या सामन्यातही गुरुवारी (दि. २६) बंगळुरू येथील एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर मानहानीकारक पराभव पत्करावा लागला. श्रीलंकेकडून आठ विकेट्सनी दारूण पराभव झाल्यानंतर इंग्लंडचा संघ यंदाच्या विश्वचषक स्पर्धेतून जवळपास बाहेर पडला आहे. या सामन्यात त्यांच्या फलंदाजांनी अतिशय संघाला लाजवेल अशी फलंदाजी केली. संघाचा डाव अवघ्या १५६ धावांवर आटोपला. प्रत्युतरात लंकेने आठ गड्यांच्या मोबदल्यात हे लक्ष्य पार केले.

# प्रशिक्षक मुझुमदार यांचे बीसीसीआय अध्यक्ष, सचिवांकडून अभिनंदन

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसआय) अमोल मुझुमदार यांची भारतीय महिला क्रिकेट संघाच्या प्रशिक्षकपदी नियुक्ती केली आहे. सुलक्षणा नाईक, अशोक मल्होत्रा आणि जतिन परांजपे यांचा समावेश असलेल्या क्रिकेट सल्लागार समितीने मुख्य प्रशिक्षकपदासाठी निवडलेल्या अर्जदारांची मुलाखत घेतली. विचारविनिमय केल्यानंतर त्रिसदस्यीय समितीने एकमताने अमोल मुझुमदार यांची हे पद स्वीकारण्याची शिफारस केली. याबद्दल बीसीसीआयचे अध्यक्ष रॉजर बिन्नी, सचिव जय शाह यांनी मुझुमदार यांचे अभिनंदन केले.

अमोल मुझुमदार यांनी २१ वर्षांच्या कारकिर्दीत १७१ प्रथम श्रेणी सामने खेळले आहेत, ज्यामध्ये त्यांनी ३० शतकांच्या मदतीने ११ हजारांहून अधिक धावा केल्या. त्यांनी १००हून अधिक लिस्ट ए सामने आणि १४ टी-२० सामन्यांमध्येही प्रतिनिधित्व केले आहे. मुझुमदार यांनी मुंबईसह अनेक रणजी विजेतेपद जिंकले आणि नंतर आसाम,



आंध्र प्रदेशचे प्रतिनिधित्व केले.

बीसीसीआयचे अध्यक्ष रॉजर बिन्नी म्हणाले, भारतीय महिला क्रिकेट संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी अमोल मुझुमदार यांच्या नियुक्तीचे मी स्वागत करतो. मला विश्वास आहे की, त्याच्या कार्यकाळात संघ खेळाच्या विविध फॉरमॅटमध्ये प्रगती करत राहील आणि चांगली कामगिरी करेल.

बीसीसीआयचे सचिव जय शाह म्हणाले, आमच्या राष्ट्रीय संघासाठी नवीन मुख्य प्रशिक्षकाची निवड करण्यासाठी सखोल मूल्यांकन आणि निवड प्रक्रिया आयोजित केल्याबद्दल मी सीएससीचे आभार मानतो. त्याचबरोबर अमोल मुझुमदार यांच्या नियुक्तीबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

**माझ्या व्हिजन आणि रोडमॅपवर विश्वास ठेवल्याबद्दल मी सीएसी आणि बीसीसीआयचे आभार मानतो. ही एक मोठी जबाबदारी आहे आणि मी प्रतिभावान खेळाडूंसोबत काम करण्यास आणि त्यांना उत्कृष्टता प्राप्त करण्यासाठी योग्य तयारी आणि मार्गदर्शन प्रदान करण्यास उत्सुक आहे.**
**-अमोल मुझुमदार**

# कबड्डी स्पर्धेत भारत पेट्रोलियम, श्रीराम क्रीडा विश्वस्त संघ अजिंक्य



## अक्षय सोनी आणि भावेश महाजन सर्वोत्तम खेळाडू

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत पेट्रोलियमने सलग तिसऱ्या वर्षी शिवनेरी सेवा मंडळाने आयोजित केलेल्या विशेष व्यावसायिक गटाचे जेतेपद पटकावले. कुमार गटात जेतेपदाचा मान श्रीराम क्रीडा विश्वस्त मंडळाने पटकाविला. भारत पेट्रोलियमचा अक्षय सोनी या गटात स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरला. कुमार गटात श्रीराम क्रीडा विश्वस्त मंडळाचा भावेश महाजन याने हा मान मिळविला.

दादर (पूर्व) येथील भवानीमाता क्रीडांगणावर झालेल्या विशेष व्यावसायिक गटाच्या अंतिम सामन्यात भारत पेट्रोलियमने बँक ऑफ बडोदाचा ४१-२३ असा पराभव करीत सलग तिसऱ्यांदा स्व. मोहन राजाराम नाईक सुवर्ण पदकावर आपले नाव कोरले. पूर्वार्धात एक लोण देत २१-१७ अशी आघाडी घेणाऱ्या पेट्रोलियमने उत्तरार्धात आणखी दोन लोण देत सामना एकतर्फी केला. पेट्रोलियमच्या अक्षय सोनी, आकाश रूडले यांनी बँकेचा बचाव खिळखिळा केला, तर अक्षय बेर्डेने उत्तम पकडी करीत आपला बचाव भक्कम केला. बँकेच्या शार्दुल पाटील, उमेश म्हात्रे यांची आज मात्रा चालली नाही. पेट्रोलियमच्या अक्षय बेर्डे स्पर्धेतील उत्कृष्ट पकडीचा, तर बँकेच्या शार्दुल पाटीलला उत्कृष्ट चढाईचा खेळाडू म्हणून देऊन गौरविण्यात आले.

श्रीराम क्रीडा विश्वस्तने विजय क्लबला ४९-२५ असे सहज नमवित स्व. मोहन नाईक चषक आपल्या नावे केला. पहिल्या सत्रातच तीन लोण देत ३२-०६ अशी भक्कम आघाडी घेणाऱ्या श्रीरामने उत्तरार्धात आणखी एक लोण देत आपल्या विजयावर शिक्कामोर्तब केले. भावेश महाजन याचा झंझावाती अष्टपैलू खेळ त्याला तुषार शिंदेची मिळालेली चढाईची, तर आशिष यादवची मिळालेली पकडीची भक्कम साथ यामुळे हा मोठा विजय शक्य झाला. विजय क्लबच्या अतुल साळवी, रोहन राज यांना दुसऱ्या सत्रात थोडा सूर सापडला, पण तोपर्यंत वेळ निघून गेली होती. श्रीरामच्या तुषार शिंदेला स्पर्धेतील उत्कृष्ट चढाईचे, तर विजय क्लबच्या अथर्व कांबळेला उत्कृष्ट पकडीचे बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेचे पारितोषिक वितरण मंत्री दीपक केसरकर यांच्या उपस्थितीत झाले.

# आयसीसी फलंदाजी क्रमवारीत शुबमन गिल अव्वल स्थानाच्या दिशेने

**दुबई : वृत्तसंस्था**

आयसीसीने विश्वचषक स्पर्धेदरम्यान नवीन एकदिवसीय क्रमवारी जाहीर केली. फलंदाजीत अव्वल स्थानावर असलेला पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझमची आघाडी सहा गुणांनी घसरली आहे. त्यामुळे त्याचे अव्वल स्थान धोक्यात आले आहे, तर भारताचा सलामीचा फलंदाज शुबमन गिल पहिल्या स्थानावर पोहचण्याच्या जवळ आहे.





गिल ८२३ गुणांसह दुसऱ्या स्थानी असून बाबर ८२९ गुणांसह अव्वल स्थानी आहे. डेंग्यू झाल्यामुळे गिलला विश्वचषकातील पहिल्या दोन सामन्यांत खेळता आले नव्हते. यानंतर त्याने तीन सामन्यांत ९५ धावा केल्या आहेत. बाबरच्या अव्वल रँकिंगच्या जवळ जाणारा तो एकमेव खेळाडू नाही. दक्षिण आफ्रिकेचा डावखुरा सलामीवीर फलंदाज क्विंटन डी कॉकही जवळ आला आहे. डी कॉकने वर्ल्ड कपमध्ये शानदार सुरुवात केली असून तीन शतके झळकावली आहेत. तो तिसऱ्या स्थानावर आहे.

डी कॉकचा सहकारी हेनरिक क्लासेनला सात स्थानांचा फायदा झाला. तो चौथ्या स्थानावर आला आहे. त्याचबरोबर भारताचा अनुभवी फलंदाज विराट कोहलीने तीन आणि ऑस्ट्रेलियाचा सलामीवीर डेव्हिड वॉर्नरने दोन स्थानांची झेप घेतली आहे. दोघेही संयुक्तपणे पाचव्या स्थानावर पोहचले आहेत.

वन डेमध्ये गोलंदाजांच्या क्रमवारीत ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज जोश हेझलवूड पहिल्या स्थानावर आहे. भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज तिसऱ्या क्रमांकावरून दुसऱ्या, तर दक्षिण आफ्रिकेचा फिरकी गोलंदाज केशव महाराज पाचव्यावरून तिसऱ्या स्थानावर गेला आहे.

# विराट कोहली वाढदिवशी ५०वे शतक ठोकेल -गावसकर

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाचा दमदार फलंदाज विराट कोहली सध्या तुफान फॉर्मात आहे. बांगलादेशविरूद्ध विराटने शतक ठोकले. वन डे क्रिकेटमधील ते त्याचे ४८वे शतक ठरले. न्यूझीलंडविरूद्ध विराटने एकाकी झुंज देत ९५ धावा केल्या, पण त्याचे शतक हुकले. वन डे क्रिकेटमध्ये मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर ४९ शतकांसह अव्वल स्थानी आहे. त्याला मागे टाकण्यासाठी आणि शतकांचे अर्धशतक ठोकण्यासाठी विराटला दोन शतकांची गरज आहे. याचबद्दल भारताचे लिटल मास्टर सुनील गावसकर यांनी मोठी भविष्यवाणी केली आहे.

विराट कोहली वन डे क्रिकेट कारकिर्दीतील ५०वे शतक ५ नोव्हेंबरला दक्षिण आफ्रिकेविरूद्ध झळकावेल. स्वत:च्या वाढदिवशी त्यापेक्षा मोठे गिफ्ट काय असू शकते? कोलकाताच्या सामन्याआधी त्याच्याकडे दोन सामने आहेत. त्यापैकी एका सामन्यात तो ४९वे शतक पूर्ण करू शकतो. इडन गार्डन्स हे त्याचे आवडते ठिकाण आहे. त्या ठिकाणी शतक ठोकल्यानंतर स्टेडियममधील लोक उभे राहून अभिनंदन करतात. त्यामुळे ही बाब कायमच पाहण्याजोगी असते. तेथील वातावरण भारावून टाकणारे असते. अशा ठिकाणी ५०वे शतक झळकावणे सर्वोत्तमच असेल, असे गावसकर म्हणाले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com